cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
बीड – महाराष्ट्र | वर्ष –४ | अंक–३४९ | सोमवार, दि.१४ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### जगाकडून अमेरिकेला जशास तसे उत्तर

ट्रम्प यांनी सुरू केलेल्या कर युद्धात आम्ही संपूर्ण ताकदीने अखेरपर्यंत लढणार आहोत असे चीनने म्हटले आहे. त्यामुळे अमेरिकेच्या कोणत्याही दबावाला चीन बळी पडणार नसल्याचे स्पष्ट आहे. आपापले आर्थिक हित जपण्यासाठी जगातील दोन प्रमुख अर्थव्यवस्थांमधील या संघर्षामुळे जागतिक अर्थव्यवस्था संकटात पडली आहे. अमेरिकेच्या कर धोरणाविरोधात चीनने जागतिक व्यापार संघटनेकडे अधिकृत तक्रार केली आहे.




# शेतकऱ्यांना मिळेल १० तास वीज

## बीलही येणार कमी; मुख्यमंत्र्यांची घोषणा



**वर्धा । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना आनंदाची बातमी दिली आहे. शेतीसाठी दिवसा वीज मिळत नसल्याची ओरड शेतकऱ्यांकडून करण्यात येत होती. शेतकऱ्यांच्या या समस्येची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवसा वीज देण्याची घोषणा केली आहे. शेतकऱ्यांना आता दिवसा १० तास वीज मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे रविवारी वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. तेथील एका कार्यक्रमात बोलताना विजेबाबत त्यांनी मोठी घोषणा केली आहे.**

राज्यातील शेतकऱ्यांना दिवसभर शेतीसाठी वीज देण्यात येणार आहे. तसेच विजेचे बिल कमी होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीसांनी दिली. विजेचे बील दर ५ वर्षांनी कमी करून द४ाखवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. राज्यातील ८० टक्के भागात आता लवकरच दिवसा १० तास वीज उपलब्ध करून देण्यात येईल. लोअर वर्धा प्रकल्पावर ५०० मेगा वॅट वीज निर्मिती प्रकल्प उभारला जातोय. वर्धा जिल्हा सौर उर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणार आहे. पान २ वर

### निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाची पुर्तता

दरम्यान राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीज दिली जाईल, असे आश्वसन निवडणुकीच्या वेळी देण्यात आले होते. त्याची पूर्तता महायुती सरकारकडून केली जात आहे. राज्यातील ८० टक्के भागात दिवसा १० तास वीज दिली जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली आहे.

# काँग्रेसला कमकुवत करण्याचा प्रयत्न

## कपिल सिब्बल यांचा केंद्रातील सत्ताधारी भाजपवर आरोप



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**काँग्रेस पक्षाला शक्तिहीन करण्यासाठी केंद्रातील भाजप सरकार तपास संस्थांचा वापर करत आहेत, असा आरोप राज्यसभेचे खासदार कपिल सिब्बल यांनी रविवारी पत्रकार परिषदेमध्ये केला. त्याचप्रमाणे नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) संबंधितांना स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबत बजावलेली नोटीस म्हणजे लोकशाहीचा अपमान असल्याचेही सिब्बल म्हणाले.**

''भारत ही लोकशाहीची जननी आहे हे आता केवळ म्हणण्यापुरते उरले असून, वास्तवात सत्ताधाऱ्यांनी त्याला हुकूमशाहीचे जनक बनविण्याचा चंग बांधला आहे,'' असा आरोप सिब्बल यांनी केला. केंद्रातील सत्ताधाऱ्यांना हिंदू-मुस्लिम मुद्द्यांवरून राजकारण करायचे आहे, त्याचप्रमाणे विरोधकांना संपवायचे आहे, असा आरोपही सिब्बल यांनी केला. आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने सुमारे ६६१ कोटी रुपयांची मालमत्ता ताब्यात घेण्याबाबत या नोटीस बजावली आहे. यात दिल्ली, पान २ वर

### स्वातंत्र्य सैनिकांचे वृत्तपत्र

सिब्बल म्हणाले की, नॅशनल हेरॉल्ड हे वृत्तपत्र स्वातंत्र्यसैनिकांनी सुरू केले होते. हे वृत्तपत्र देशभर स्वातंत्र्याचा संदेश देण्यासाठी आणि भारत एकसंध राहावा तयार सुरू करण्यात आले होते, आणि त्या वेळी स्वातंत्र्यसैनिकच त्याचे भागधारक (शेअरहोल्डर्स) होते. हे वृत्तपत्र कल्याणकारी उद्देशांसाठी स्थापन झाले होते मात्र त्यांच्याकडे त्यावेळी पुरेसे आर्थिक स्रोत नव्हते. त्यामुळे काँग्रेसने अनेक वर्षांत त्यांना एकूण ९० कोटी रुपये दिले, परंतु या कर्जाची परतफेड होऊ शकली नाही. दरम्यान 'यंग इंडिया' ही कंपनी त्या कर्जाच्या ५० लाख रुपयांच्या हस्तांतरासाठी स्थापन करण्यात आली. मात्र ही एक सेक्शन २५ कंपनी होती. याचा अर्थ कंपनीच्या भागधारकांना कोणताही नफा घेण्याचा अधिकार नसतो.त्यामुळेच या कंपनीचे भागधारक असलेल्या राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांनी या कंपनीचा कोणताही लाभ घेतलेला नाही.''

### 'काँग्रेसकडे पुरेसा पैसा नाही'

''जेवढे मला माहीत आहे त्यानुसार, काँग्रेस पक्षाकडे पुरेसा पैसाच नाहीये, त्यामुळे त्यांना पक्ष चालविणे कठीण होणार आहे. हा लोकशाहीचा अपमान आहे. हे अत्यंत दुर्दैवी असून यातून सत्ताधाऱ्यांची मानसिकता दिसून येत आहे,'' असे सिब्बल म्हणाले. सत्ताधारी भाजप तपास यंत्रणांचा धाक दाखवून त्यांना स्वतःकडे यायला भाग पाडतील. मग ज्यांच्यावर त्यांनी टीका केली होती अशांना अगदी मंत्रिपदेही देतील.असे करून विरोधक उरलेच नाहीत की मग ईडीची आवश्यकताही उरणार नाही, असा टोलाही सिब्बल यांनी यावेळी लगावला.

# सुरेश धस, संदीप क्षीरसागरांकडून शिक्षक बदली प्रक्रियेत ३९ कोटींचा घोटाळा

## ओबीसी नेत्याचा गंभीर आरोप; बिंदू नामावलीच्या माध्यमातून घोटाळा केल्याचा आरोप




**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात २०१४ साली जिल्हा परिषद शिक्षक आंतर जिल्हा बदली मध्ये तत्कालीन मंत्री सुरेश धस, जिल्हा परिषद अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला, जिल्हा परिषद शिक्षण सभापती संदीप क्षीरसागर यांनी तब्बल ३९ कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप ओबीसी नेते बाळासाहेब सानप यांनी केला. बीडमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. बीड मधील बिंदू नामावलीच्या घोटाळ्यासंदर्भात सुरेश धस यांनी तक्रार केल्यानंतर हा मुद्दा ऐरणीवर आला आहे.**

बाळासाहेब सानप म्हणाले की, १४ वर्षानंतर बीड जिल्हा परिषदेत बिंदू नामावली प्रश्न उद्भवला आहे. ज्यावेळी आंतरजिल्हा बदल्या सुरू होत्या, त्या काळात २०१४ साली सर्व शिक्षकांनी मागणी केली होती की, बीड जिल्ह्यामध्ये आम्हाला परत पान २ वर

### बिंदू नामावलीच्या माध्यमातून एका समाजाला टार्गेट

२०१४ ते २४ पर्यंत बिंदू नामावलीचा प्रश्न कुठेच निघाला नाही. मात्र आता आमदार सुरेश धस हा प्रश्न उपस्थित करून जाती-जातीत तेढ निर्माण करत आहेत. एका समाजाला टार्गेट करण्याचे काम करत आहेत. धस यांनी राज्याच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची दिशाभूल केली आहे. त्यामुळे आम्ही मंगळवारी शिक्षकांचे शिष्टमंडळ घेऊन राज्याच्या मुख्यमंत्र्यांना भेटणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची देखील भेट घेणार आहोत, असे त्यांनी यावेळी सांगितले.

### भरती प्रक्रियेत पंकजा मुंडे यांचा कुठलाही संबंध नव्हता

सुरेश धस यांनी स्टेटमेंट केले की, पंकजा मुंडे मंत्री असताना हा घोटाळा झाला आहे. परंतु पंकजा मुंडे त्यावेळी मंत्री नव्हत्या. या भरती प्रक्रियेत पंकजा मुंडे यांचा कुठलाही संबंध नव्हता. २०१४ साली इतके सगळे शिक्षक बीडमध्ये आले, तेव्हा ७०० लोकांना पगार मिळत नव्हता. दीड वर्ष शिक्षकांनी येथे आंदोलन केले होते. या आंदोलनाला कारणीभूत हे तिघेच आहेत. जागा नसताना भरती करून घेण्यात आली, याचे देखील कारण हे तिघेच आहेत. त्यामुळे सुरेश धस, सय्यद अब्दुल्ला, संदीप क्षीरसागर यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी बाळासाहेब सानप यांनी केली आहे.

# इतिहासाचा दाखला देताना अभ्यास करावा लागतो, संदर्भग्रंथ वाचावे लागतात

## गुणरत्न सदावर्तेंची उदयनराजेंवर बोचरी टीका

**मुंबई । प्रतिनिधी**

इतिहासाचा दाखला देताना अभ्यास करावा लागतो, संदर्भग्रंथ वाचावे लागतात, इतिहास माहिती असावा लागतो, असेच सहज बोलून चालत नाही, असे म्हणत गुणरत्न सदावर्ते यांनी उदयनराजे भोसले यांनी महात्मा फुलेंबद्दल केलेल्या वक्तव्यावरुन पलटवार केला आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांचा अभ्यास आज जगभरातील अनेक देशांतील विद्यापीठांमध्ये शिकवला जातो. अनुकरण या शब्दाचा संदर्भ त्यांना पान २ वर



# मुंबई विमानतळावरून पावणे सात किलो सोने जप्त

**मुंबई । प्रतिनिधी**

**सोन्याचा भाव ९९ हजारांच्या घरात असताना बँकॉकमधून आणलेले तब्बल पावणे ७ किलो वजनाचे सोने मुंबई विमानतळावरून अमंलबजावणी व सक्तवसुली संचालनालयाने जप्त केले आहे. या प्रवाशाची अंगझडती करण्यात आली. यात प्रवाशाने घातलेल्या बुटात १४ सोन्याचे बार सापडले. बँकॉकहून मुंबईला जाणारे विमान टीजी ३१७ ने प्रवास करणाऱ्या एका प्रवाशाला सोने तस्करी प्रकरणी अटक करण्यात आली आहे.**

मुंबईत अमंलबजावणी व सक्तवसुली संचालनालयाने डीआरआयच्या पथकाला मोठे यश मिळाले असून बँकॉकमधून मुंबई विमानतळावर एका प्रवाशाला सोने तस्करी प्रकरणी अटक केली आहे. त्याच्याकडून अंगझडतीत प्रवाशाने घातलेल्या बुटात १४ सोन्याचे बार सापडले असून पान २ वर

# ज्याच्याकडे गुणवत्ता आहे तो जगावर राज्य करू शकतो - माजी मंत्री क्षीरसागर



**नेकनूर । प्रतिनिधी**

**विज्ञानाच्या जोरावर माणसे साता समुद्रापार गेले आहेत. विज्ञानाचा योग्य वापर केला पाहिजे आजच्या काळात मन, माणूस, माणूसकी जपणे आवश्यक आहे. ज्याच्याकडे गुणवत्ता आहे तो जगावर राज्य करू शकतो असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.**

श्री कालिकादेवी मंदीर संस्थान नेकनूर येथे वार्षिक सर्वसाधारण सभा २०२५ मान्यवरांचे व गुणवंतांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विलास बडगे, दिनकर कदम, अरूण डाके, नानासाहेब काकडे, सखाराम मस्के, रामदास फुटाणे, जफर काझी, शिवाजी काटकर, शिवाजी भांडेकर आदिंची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्राचा तमाम कासार समाज एकत्र आला असून आपली बांधिलकी समाजाची आहे असे समजून या कार्यक्रमाला पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३४.५० क्विंटल | २,००० | ३,०७० | २,५५५ |
| ज्वारी/हायब्रिड: ३७९.०० क्विंटल | १,७५१ | ३,२०१ | २,४०६ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ११.५० क्विंटल | ६,५५० | ७,१५० | ६,९५५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: १२९.५० क्विंटल | २,०७० | २,७५१ | २,४८० |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन:१७१.५० क्विंटल | ४,४२५ | ४,५११ | ४,४७१ |
| हरभरा: ६.०० क्विंटल | ५,५०० | ५,५९० | ५,५४७ |

# तहव्वुर राणाच्या आवाजाचा एनआयए घेणार नमुना ; कॉल रेकॉर्डची करणार पुष्टी




**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

२६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार तहव्वुर राणाला गुरुवारी अमेरिकेतून विमानाने भारतात आणण्यात आले. राणाचे प्रत्यार्पण ''ऑपरेशन राणा'' या अत्यंत गुप्त मोहिमेअंतर्गत झाले. न्यायालयाने राणाला १८ दिवसांसाठी एनआयएची कोठडी सुनावली आहे. राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) सलग तिसऱ्या दिवशी चौकशी केली आहे. दहशतवादी हल्ल्यांशी संबंधित कॉल रेकॉर्डची पुष्टी करण्यासाठी राणाचा आवाजाचा नमुना पान २ वर

# राज्यपालांनी विद्यार्थ्यांना द्यायला लावल्या जय श्रीरामच्या घोषणा

## विरोधकांनी केली राजीनाम्याची मागणी




**चेन्नई । वृत्तसंस्था**

**तामिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. मदुराई येथील एका खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांना कथितरित्या 'जय श्रीराम'च्या घोषणा देण्यास सांगितल्यामुळे राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. यामुळे त्यांना पदावरून हटवण्याची मागणी केली जात आहे.**

मदुराईच्या त्यागराज अभियांत्रिकी महाविद्यालयात एका कार्यक्रमात राज्यपाल रवी यांनी प्रमुख पाहुणे म्हणून सहभाग घेतला होता. कार्यक्रमात त्यांनी तमिळ साहित्यिक कंबर आणि त्यांच्या पान २ वर

# रस्ते विकासासाठी १० लाख कोटींची गुंतवणूक; गडकरींची मोठी घोषणा



**नागपूर । प्रतिनिधी**

**येत्या दोन वर्षांत संपूर्ण देशभरातील महामार्गांच्या पायाभूत सुविधांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणण्याचा निर्धार केंद्र सरकारने केला आहे. यासाठी १० लाख कोटी रूपयांची मोठी गुंतवणूक करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.**

गडकरी म्हणाले की, विशेषतः ईशान्य भारतातील रस्त्यांचे जाळे अमेरिकेतील रस्त्यांच्या तोडीस तोड असेल. देशात आगामी दोन वर्षांत १० लाख कोटी रूपयांच्या प्रकल्पांचे काम सुरू होणार असून, त्यात ईशान्य भारत व सीमावर्ती भागांवर विशेष भर असेल. ईशान्य भारतातील खडतर भौगोलिक रचना आणि सीमावर्ती भागांतील महत्त्व लक्षात घेता, त्या भागातील रस्ते पायाभूत सुविधा भक्कम करणे अत्यावश्यक आहे. गडकरी यांनी स्पष्ट केले की, एकूण २१,३५५ किमी लांबीच्या ७८४ महामार्ग प्रकल्पांवर काम होणार असून, यासाठी ३.७३ लाख कोटी रूपये खर्च पान २ वर

### महामार्गांचे जाळे वेगाने विस्तारले

गडकरी यांनी सांगितले की, देशातील राष्ट्रीय महामार्गांचे जाळे २०१४ मध्ये ९१,२८७ किमी होते ते आता १,४६,२०४ किमीवर पोहोचले आहे. दोन लेनपेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यांचा हिस्सा ३० टक्क्यांवरून ९ टक्क्यांवर आला आहे. २०२४-२५ ५,६१४ किमी राष्ट्रीय महामार्गांचे बांधकाम पूर्ण केले असून, त्याने आपले ५,१५० किमीचे लक्ष्य ओलांडले आहे. देशाची पायाभूत रचना जगातील सर्वोत्तम दर्जाशी साजेशी बनवण्याचा आमचा निर्धार आहे, असे गडकरी यांनी स्पष्ट केले.

cmyk

cmyk



## अग्रलेख

# जगाकडून अमेरिकेला जशास तसे उत्तर

ट्रम्प यांनी सुरू केलेल्या कर युद्धात आम्ही संपूर्ण ताकदीने अखेरपर्यंत लढणार आहोत असे चीनने म्हटले आहे. त्यामुळे अमेरिकेच्या कोणत्याही दबावाला चीन बळी पडणार नसल्याचे स्पष्ट आहे. आपापले आर्थिक हित जपण्यासाठी जगातील दोन प्रमुख अर्थव्यवस्थांमधील या संघर्षामुळे जागतिक अर्थव्यवस्था संकटात पडली आहे. अमेरिकेच्या कर धोरणाविरोधात चीनने जागतिक व्यापार संघटनेकडे अधिकृत तक्रार केली आहे. ट्रम्प यांच्या व्यापार शुल्काला प्रत्युत्तर देत युरोपीय महासंघानेही अमेरिकेवरील आयातशुल्क वाढवल्याने जागतिक स्तरावर व्यापारयुद्ध पेटले आहे. ट्रम्प यांनी भारतासह ७० देशांवर लादलेल्या व्यापारकरामुळे जागतिक व्यापारव्यवस्था कोलमडू लागली आहे. या करांमुळे जगभरातील भांडवली बाजारांची दाणादाण उडाली. खनिज तेलाचे दरही कोसळू लागले आहेत. ही परिस्थिती जागतिक मंदीची लक्षणे दाखवत आहे.

युरोपीय महासंघानेही ट्रम्प यांच्या कर धोरणाविरोधात दंड थोपटले आहेत. अमेरिकेने पोलाद आणि ॲल्युमिनियमच्या आयातीवर लादलेल्या २५ टक्के शुल्काला प्रत्युत्तर म्हणून १५ एप्रिलपासून अमेरिकेच्या काही मालाच्या आयातीवर २५ टक्के शुल्क आकारण्याचे जाहीर केले आहे. अमेरिकेशी वाटाघाटी करण्याचा पर्यायही खुला ठेवला आहे. पुढच्या टप्प्यात १५ मे पासून आणि त्यानंतर १ डिसेंबरपासून आयात शुल्क आकारण्याचे २७ युरोपीय देशांच्या महासंघाने जाहीर केले आहे. व्यापारयुद्धाचे वारे वाहू लागल्याने अमेरिका व चीन या दोन्ही देशांनी आपली बाजू भक्कम करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. अमेरिकेशी थेट करयुद्ध पुकारणाऱ्या चीनने भारतासह शेजारी राष्ट्रांशी घोरणात्मक संबंध मजबूत करू असे म्हटले आहे. म्हणजे आयात शुल्कामुळे अमेरिकेसोबतचा तणाव वाढल्याने चीनला शेजारधर्माची आठवण झाली. चीनद्वारा भारतासोबत सीमाभागातील तणाव कमी करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. जपान आणि दक्षिण कोरियासारख्या अन्य देशांसोबतचे संबंध सुधारण्यासाठी चीन प्रयत्नशील आहे. पूर्व लडाखमध्ये सैन्य संघर्ष झाल्यामुळे चीन आणि भारतामधील संबंध चार वर्षांहून अधिक काळ बिघडले होते. चीनची चाल लक्षात आल्यानंतर अमेरिकेनेही करवाढीनंतर वाटाघाटीचा पर्याय खुला ठेवला आहे. कर आकारण्यात आलेल्या ७० देशांशी चर्चेसाठी आमची तयारी झाली असून लवकरच ती प्रक्रिया सुरू केली जाईल असे अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसेंट यांनी म्हटले आहे. चीनशी जवळिक महागात पडू शकेल असा इशारा त्यांनी अमेरिकेच्या विरोधातील संभाव्य आघाडीला दिला आहे. कोलमडलेली जागतिक व्यापार व्यवस्था पुन्हा सुरळीत करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू असे जपान आणि कॅनडाने म्हटले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या आर्थिक धोरणांचा निषेध करण्यासाठी लाखो अमेरिकन नागरिक रस्त्यावर उतरले हे तिथे लोकशाही जिवंत असल्याचे लक्षण आहे. आम्ही सत्तेवर आल्यास अमेरिकी नागरिकांना चांगले दिवस येतील. त्यांची संपत्ती वाढेल, गुंतवणुकीवरील परतावा सशक्त होईल अशी आश्वासने ट्रम्प यांनी दिली होती. परंतु सत्तेवर येताच आपल्या भांडवलदार मित्राच्या हिताच्या योजना राबविणे हेच ट्रम्प यांचे धोरण दिसले. आपल्याकडे जसे अच्छे दिन आयेंगे चे अमिष दाखवण्यात आले, आश्वासन देण्यात आले तसाच प्रकार अमेरिकेतही दिसतो आहे. म्हणजेच देशोदेशी मातीच्या चुली. अमेरिकेतील मतदारांनी मेक अमेरिका ग्रेट अगेनच्या घोषणेवर फिदा होऊन ट्रम्प यांना निवडून दिले. परंतु आज परिस्थिती अशी आहे की, संभाव्य महागाईच्या चटक्यांची चिंता अमेरिकी नागरिकांना भेडसावू लागली आहे. आता जनता ट्रम्प यांच्या धोरणाविरोधात मोठ्या संख्येने रस्त्यावर येऊ लागली आहे. ट्रम्प यांच्या आततायी निर्णयामुळे जगावर येऊ घातलेल्या मंदीविरोधात भारतीय पंतप्रधानांनी मन की बात करणे आवश्यक बनले आहे. एका अविचारी माणसाने आपल्या अहंकारापोटी साऱ्या जगाला वेठीस धरले आहे आणि त्यावर विश्वगुरू म्हणून मिरवणारे चकार शब्दही काढत नाहीत. जागतिक महासत्ता होण्याचे दावे करणाऱ्या देशाला हे शोभते काय? सिंगापूरसारख्या छोट्या देशाचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग ट्रम्प यांच्या विरोधात आवाज उठवतात, आमच्या विश्वगुरूंना ते का जमू नये? माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांची मौनीबाबा अशी हेटाळणी करणारे आज स्वतःच मौनीबाबाच्या भूमिकेत का गेले आहेत? भारतात परीक्षा पे चर्चा करताना विद्यार्थ्यांना उपदेशाचे डोस पाजणे सोपे आहे. पण अमेरिकेच्या परीक्षेला बसण्याची वेळ येते तेव्हा घाम फुटतो. येथे मौनम् सर्वार्थ साधनम् खरे ठरते.

# ज्याच्याकडे गुणवत्ता आहे तो जगावर राज्य करू शकतो–माजी मंत्री क्षीरसागर

**नेकनूर । प्रतिनिधी**

**विज्ञानाच्या जोरावर माणसे साता समुद्रापार गेले आहेत. विज्ञानाचा योग्य वापर केला पाहिजे आजच्या काळात मन, माणूस, माणूसकी जपणे आवश्यक आहे. ज्याच्याकडे गुणवत्ता आहे तो जगावर राज्य करू शकतो असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.**



श्री कालिकादेवी मंदीर संस्थान नेकनूर येथे वार्षिक सर्वसाधारण सभा २०२५ मान्यवरांचे व गुणवंतांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विलास बडगे, दिनकर कदम, अरूण डाके, नानासाहेब काकडे, सखाराम मस्के, रामदास फुटाणे, जफर काझी, शिवाजी काटकर, शिवाजी भांडेकर आदिंची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्राचा तमाम कासार समाज एकत्र आला असून आपली बांधिलकी समाजाची आहे असे समजून या कार्यक्रमाला सर्व समाज बांधव येतात. यावर्षी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आपला स्नेहाचा धागा एकत्र येऊन दाखवतात. समाजात जन्म झाला की जीवन सार्थकी लावावे हे सगळया समाजाचे आहे. आजची मुले मोबाईलच्या आधीन गेले असून मोबाईलचा योग्य वापर केला पाहिजे. जिद्द, चिकाटी, मेहनतीच्या जिवावर वेगवेगळया क्षेत्रातील परिक्षा देऊन विद्यार्थी करिअर घडवित आहेत. एकीचा आवाज वाढवणे गरजेचे आहे मन, माणूस, माणूसकी जपणे आजच्या काळाची गरज असून हीच माणसाला तारणारी आहे. सर्व समाजातील विद्यार्थी गुणवत्तेची कास धरीत आहेत असे त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हाभरातील व जिल्हयाबाहेरील समाजाची उपस्थिती होती.

# शहराच्या पाणी प्रश्नी आ.संदीप क्षीरसागर, सय्यद सलीम यांनी केली पाणी पुरवठा कामाची पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

**सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू असल्याने नागरिकांना पाण्यासाठी अडचण येऊ नये यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांची धावपळ सुरू आहे. शनिवार (दि.१२) रोजी भर उन्हात आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी म्हाळसजवळा येथे जाऊन सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना जलदगतीने काम पूर्ण करण्याच्या सूचना केल्या आहेत. काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे आणि शहरातील नागरिकांना वेळेत पाणी मिळावे यासाठी आमदार क्षीरसागर यांचा प्रयत्न सुरू आहे.**



सध्या उन्हाच्या झळा अधिक तीव्र होऊ लागल्या आहेत. त्याचा परिणाम पाणी पुरवठ्यावर देखील होऊ लागला आहे. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या योजनेचे काम म्हाळसजवळा परिसरात सुरू आहे. शनिवारी दुपारी भर उन्हात आ. संदीप क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम यांनी म्हाळसजवळा येथे भेट देऊन कामाची पाहणी केली. यावेळी आ. संदीप क्षीरसागर यांनी बीड शहरातील पाणी पुरवठ्याच्या अनुषंगाने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना योग्य त्या सुचना केल्या आहेत तसेच काम अधिक गतीने पूर्ण करण्याचेही निर्देश दिले आहेत.

# नगर पंचायतच्या कोटी रुपयाची मालमत्ता स्ममशानभूमीत पडून?



**जालना । प्रतिनिधी**

जनतेच्या पैशाने सरकारने वाहन खरेदी केले परंतु बदनापूर मुख्याधिकारी यांनी कोणतेही नियमाचे पालन न करता अग्निशामक दलाची दोन गाड्या एका खाजगी कंपनीला भाड्याने दिल्या असल्याच्या समजते परंतु या प्रकरणी जिल्हाधिकारी व लोकप्रतिनिधी तसेच पालकमंत्री याप्रकरणी चौकशी करावी अशी मागणी होत आहे. तसेच घंटागाड्या स्मशानभूमीत धुळखात पडून असल्याचे दिसून येत आहे . या सर्व प्रकरणी बदनापूरचे आमदार यांनी तत्काळ लक्ष द्यावे तसेच या प्रकरणी खा.डॉ.कल्याण काळे व जिल्हाधिकारी यांनी पण चौकशी करावी अशी मागणी होत आहे.







बीडः शनिवारी दि .१२ रोजी विप्रनगर येथे श्री युवा माहेश्वरी संघटनच्या माध्यमातून श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त श्री मनोजजी महाराज गौड यांच्या सुमधुर वाणीतून संगीतमय सुंदरकांडचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित राहून श्री हनुमान जन्मोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी परिसरातील महिला पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुतण्याने केला चुलत्याचा खून, चार जणाविरुद्ध गुन्हा दाखल

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील घनसावंगी रस्त्यालगत पांगरखेडा येथे पुतण्याने केला चुलत्याचा खून याप्रकरणी पोलिसांनी चार जनाविरुद्ध गुन्हा दाखल केला. याप्रकरणी चार आरोपींना अटक केले असल्याचे समजते याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक ठुबे यांच्याकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केले असता त्यांनी कॉल सुकरला नाही तसेच श्री ठुबे हे छत्रपती संभाजी नगर इथून अपडाऊन करीत असल्याचे बोलल्या जात आहे. तसेच बीट जमादार कुठे येणे कॉल न घेता पण माहिती देण्यास टाळाटाळ केली. तसेच या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अंबड इथे राहणारे असावे तसेच कायमस्वरूपी पोलीस निरीक्षक देण्यात यावी अशी पण मागणी काही तज्ञ लोकांकडून सांगण्यात येते. सदरील खून प्रकरणी सदरील घटना १२ एप्रिल रोजी घडली सदर ही घटना शेतीच्या व कौटुंबिक वादातून झाल्याचे समजते. चार आरोपी अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये एका विधीसंघर्ष बालकाचाही समावेश आहे. दिगंबर श्रीरंग लांडे वय ५०ते६० असे मृत व्यक्तीचे नाव असून, काही दिवसांपासून सुरू असलेल्या कौटुंबिक वादाचे पर्यवसान हिंसक घटनेमुळे पुतण्या आणि भावाने मिळून त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. बेदम मारहाणीमुळे लांडे हे जागीच बेशुद्ध झाले. ग्रामस्थांच्या मदतीने त्यांना तात्काळ अंबड उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जालना जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. परंतु त्याचा मृत्यू झाला घटनेची माहिती मिळताच अंबड पोलिसांनी त्वरित तपास सुरू केला. मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणात चार जुनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आली असून त्यामध्ये एका विधीसंघर्ष बालकाचाही समावेश आहे.

# भिडे वाडा राष्ट्रीय स्मारक होतेय याचे समाधान–ॲड.शिंदे

**पुणे । प्रतिनिधी**

**ज्या पवित्र स्थळी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांनी देशातील पहिली मुलींची शाळा सुरू केली, त्या वाड्याचा विकास होत असल्याचे पाहून आनंद झाला असल्याची प्रतिक्रिया महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष सतीश शिंदे यांनी दिली.**





पुणे येथील भिडे वाडा येथे महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष एड. सतीश शिंदे यांनी भेट दिली . यानंतर त्यांनी प्रतिक्रिया दिली. २०१८ साली महात्मा फुले युवा दलाच्या वतीने भिडे वाड्याला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा मिळावा म्हणून एक महिनाभर राज्यव्यापी स्वाक्षरी मोहीम राबवण्यात आली होती. या मोहिमेच्या माध्यमातून हजारो नागरिकांचे स्वाक्षरीयुक्त निवेदन मुख्यमंत्री आणि देशाचे पंतप्रधान यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले होते. भिडे वाडा ही केवळ एक ऐतिहासिक वास्तू नसून, भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याचा उगमबिंदू आहे. इथे पेटवलेली स्त्रीशिक्षणाची ज्योत, आजही संपूर्ण देशात ज्ञानप्रकाश पसरवते आहे.आज या शाळेला आणि भिडे वाड्याला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा देण्याच्या दिशेने उचलले गेलेलं पाऊल म्हणजे आपल्या सामाजिक इतिहासाचा गौरव आहे. या ऐतिहासिक स्थळाच्या संवर्धनासाठी महायुती सरकारने घेतलेल्या पुढाकाराबद्दल एड.सतीश शिंदे यांनी सरकारचे आभार मानले.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांना, मिळेल

येथील नेरी मिर्झापुर गावाला संपूर्ण सौर ऊर्जा देण्यात आली असून फडणवीसांनी येथील गावकऱ्यांचे अभिनंदन केले. वर्ध्यातील आमदार-खासदारांनी ज्या वेगवेगळ्या मागण्या केल्या आहेत, त्यासाठी एक बैठक घेऊन त्यावर निर्णय घेतला जाईल, असे आश्वासनही फडणवीस यांनी दिले.

---------

### सुरेश धस, संदीप क्षीरसागरांकडून शिक्षक

यायचे आहे. त्यावेळी सुरेश धस राज्याचे मंत्री होते. जिल्हा परिषद अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला होते आणि संदीप क्षीरसागर हे त्यावेळी जिल्हा परिषदेचे शिक्षण सभापती होते. त्या काळात ही सगळे भरती झाली आहे. त्या काळात प्रत्येक जणांकडून तीन लाख रुपये घेण्यात आले. तेराशे लोकांचे तीन लाख रुपये म्हणजेच एकूण जवळपास ३९ कोटी रुपयांचा घोटाळा २०१४ मध्ये झाला असा आरोप त्यांनी केला.

----------

### काँग्रेसला कमकुवत

मुंबई आणि लखनौ येथील नॅशनल हेरॉल्ड आणि असोसिएट जर्नलसल्स लिमिटेडच्या (एजेएल) इमारती रिक्त कराव्यात असे सांगण्यात आले आहे. ''या इमारतींमध्ये काँग्रेसची कार्यालये असून, हेरॉल्ड प्रकरणी कारवाईच्या नावाखाली केंद्र सरकार काँग्रेस पक्षाची ताकद कमकुवत करण्याचा प्रयत्न केला जात आहे,'' असा आरोप सिब्बल यांनी केला. काँग्रेस पक्षाने काय गुन्हा केला आहे? तुम्ही त्यांच्यावर कारवाईसाठी १३ वर्षे का थांबलात? असे सवाल उपस्थित करत केंद्राला ती संपत्ती हडप करायची आहे, असा आरोप सिब्बल यांनी केला.''नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी देशभरात ज्या जागा रिक्त करण्याचा आदेश देण्यात आला आहे, तेथे काँग्रेसची कार्यालये आहे. या जागा ताब्यात घेतल्यानंतर काँग्रेसला पक्षाचा कारभार चालवायला कार्यालयेच उरणार नाहीत आणि काँग्रेस कमकुवत होईल. असा सत्ताधाऱ्यांचा डाव आहे,'' असा दावा सिब्बल यांनी केला.

----------

### ज्याच्याकडे गुणवत्ता आहे तो जगावर

सर्व समाज बांधव येतात. यावर्षी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आपला स्नेहाचा धागा एकत्र येऊन दाखवतात. समाजात जन्म झाला की जीवन सार्थकी लावावे हे सगळया समाजाचे आहे. आजची मुले मोबाईलच्या आधीन गेले असून मोबाईलचा योग्य वापर केला पाहिजे. जिद्द, चिकाटी, मेहनतीच्या जिवावर वेगवेगळया क्षेत्रातील परिक्षा देऊन विद्यार्थी करिअर घडवित आहेत. एकीचा आवाज वाढवणे गरजेचे आहे मन, माणूस, माणूसकी जपणे आजच्या काळाची गरज असून हीच माणसाला तारणारी आहे. सर्व समाजातील विद्यार्थी गुणवत्तेची कास धरीत आहेत असे त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हाभरातील व जिल्हयाबाहेरील समाजाची उपस्थिती होती.

-----------

### मुंबई विमानतळावरून

त्याचे एकूण वजन ६७३५.४२ ग्रॅम एवढे होते. या सोन्याची साधारण किंमत ६.३० कोटी रुपये एवढी आहे.

----------

### इतिहासाचा दाखला देताना अभ्यास

माहित आहे का? एकतर तुम्ही समोर या, सगळे नीट समजावून सांगा आणि जर नाही करू शकत, तर तुमही माफी मागितली पाहिजे, असेही गुणरत्न सदावर्ते यांनी म्हटले आहे. राज्यात गेल्या काही दिवसांपासून महापुरुषांबद्दल चुकीची वक्तव्य केल्यावरुन संताप व्यक्त होत आहे. त्यातच, छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अवमानजनक वक्तव्य करणाऱ्यांविरुद्ध कायदा केला पाहिजे, अशी परखड भूमिका खासदार उदयनराजे भोसले यांनी घेतली. मात्र, महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन केल्यानंतर त्यांनी स्त्री शिक्षणाचा इतिहास सांगितला. त्यावरुन, आता वाद निर्माण होत आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उदयनराजेंवर टीका केली होती. आता, ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी देखील उदयनराजेंनी समोर येऊन इतिहास समजावून सांगावा किंवा माफी मागावी, असे मह्टले आहे. सर्वप्रथम स्त्री शिक्षणाची शाळा जर कुणी सुरु केली असेल, तर ती थोरले प्रतापसिंह महाराज यांनी सुरु केली. ती देखील स्वतःच्या राजवाड्यात सुरु केली. त्या राजवाड्यात कालांतराने ज्यांनी देशाचं संविधान लिहीलं ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचं प्राथमिक शिक्षण झालं. महात्मा फुलेंनी त्यांचं अनुकरण केलं, असे खासदार उदयनराजे भोसले यांनी म्हटलं होतं. विशेष म्हणजे महात्मा फुले वाड्यात त्यांनी हे वक्तव्य केले. यावरून त्यांच्यावर सर्वत्र टीका होत आहे.

--------------

### राज्यपालांनी विद्यार्थ्यांना द्यायला

कंब रामायण या रामायणाच्या आवृत्तीचे सांस्कृतिक महत्त्व सांगितले. याच दरम्यान, त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना 'जय श्रीराम'च्या घोषणा देण्यास सांगितल्या. या घटनेनंतर सत्ताधारी पक्षाने राज्यपालांवर जोरदार टीका केली आहे. पक्षाच्या नेत्यांनी राज्यपालांवर राजकीय हेतूने धार्मिक घोषणा देण्याचा आरोप केला आहे. त्यांच्या मते, अशा कृतींमुळे शिक्षण संस्थांतील धर्मनिरपेक्षतेचा भंग होतो. स्टेट प्लॅटफॉर्म फॉर कॉमन स्कूल सिस्टीम या शैक्षणिक संघटनेनेही राज्यपाल रवी यांना हटवण्याची मागणी केली आहे. संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे की, ''सरकारी अनुदानित महाविद्यालयातील कार्यक्रमात विद्यार्थ्यांना विशिष्ट धार्मिक घोषणांसाठी उद्युक्त करणे हे घटनात्मक पदाचा गैरवापर आहे.'' आर. एन. रवी यांनी याआधीही राज्य विधेयकांवर मंजुरी न देण्याच्या मुद्द्यावरून सर्वोच्च न्यायालयाची नाराजी ओढवून घेतली आहे. आता 'जय श्रीराम' घोषणांमुळे पुन्हा एकदा ते चर्चेत आले आहेत. यावर प्रतिक्रिया देताना, त्यांनी फक्त सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची वाट पाहत असल्याचं नमूद केलं. दरम्यान, आर. एन. रवी यांनी विद्यार्थ्यांना 'जय श्रीराम'च्या घोषणा देण्यास सांगितल्याने तामिळनाडूमधील राजकारण तापले आहे.

-----------

### तहव्वुर राणाच्या आवाजाचा एनआयए

घेण्याच्या तयारीत एनआयए असल्याचे वृत्त आहे. मुंबईवर २६नोव्हेंबर २००८ मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये एकूण १६६ लोक ठार झाले होते. तर २३८ हून अधिक जखमी झाले होते. एका रिपोर्टनुसार, राणाच्या आवाजाचा नमुना कॉल रेकॉर्डशी जुळवून एनआयए अधिकारी २६ नोव्हेंबर २००८ च्या हल्ल्यादरम्यान तो फोनवरून सूचना देत होता की नाही हे निश्चित करणार आहेत. त्याच्या आवाजाचा नमुना मिळवण्यासाठी एनआयएला राणाची संमती आवश्यक असेल. जर त्याने नकार दिला तर न्यायालयाची परवानगी घ्यावी लागणार आहे. तसेच राणाने आवाजाचा नमुना घेण्यास नकार दिल्यास याची नोंद आरोपपत्रात केली जाईल, खटल्यादरम्यान त्याच्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो, असेही सूत्रांनी स्पष्ट केले आहे.

-----------

रस्ते विकासासाठी १० लाख

अपेक्षित आहे. या प्रकल्पांमध्ये रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयचा समावेश आहे. सध्या केवळ आसाममध्ये ५७६९६ कोटींचे, बिहारमध्ये ९०००० कोटींचे, पश्चिम बंगालमध्ये ४२००० कोटींचे, झारखंडमध्ये ५३००० कोटींचे आणि ओडिशामध्ये ५८००० कोटींचे प्रकल्प कार्यान्वित आहेत. आसाम वगळता ईशान्य भारतात याच आर्थिक वर्षात १ लाख कोटींच्या प्रकल्पांवर काम सुरू आहे,'' असेही गडकरी यांनी सांगितले.

cmyk

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. १४ एप्रिल २०२५



## राधाकृष्ण नागरी येथील हरिनाम सप्ताहात जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांचा सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

पांगरी रोड येथील राधाकृष्ण नागरी येथे हनुमान जयंती निमित्त अखंड हरीनाम सप्ताह चे आयोजन करण्यात आले होते. आज त्याची सांगता ह.भ.प सुरेशानंदजी महाराज कोळेकर यांच्या काल्याच्या हरीकीर्तनाने झाली. या सप्ताहच्या सांगतेचे मुख्य यजमान म्हणून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम हे होते.

यावेळी उल्हास गिराम यांच्या हस्ते महाराजांचा आदरसत्कार करण्यात आला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जिल्हाप्रमुखपदी उल्हास गिराम यांची निवड झाल्याबद्दल सप्ताह आयोजन समितीच्या वतीने गिराम यांचा सत्कार करण्यात आला, या वेळी आयोजक गणेश खाडे, मधुकर बालटे, दिपक बिल्पे, मुकेश शिवगन, सचिदानंद देशमुख, नरेंद्र कुलकर्णी, रवींद्र बाजगुडे सह परिसरातील भक्तगण मोठया प्रमाणावर उपस्थित होता.

# येवलवाडीच्या नामधारी महिला सरपंचांवर अविश्वासाचा ठराव मंजूर

## सहाविरुद्ध दोन मतदानाने ठराव पास; आ.सुरेश धस गटाला हादरा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील येवलवाडी ग्रामपंचायत च्या महिला सरपंच या फक्त नामधारी असुन कामधारी म्हणून कारभार त्यांचे पती हेच हाकत असल्यामुळे आणि गावात विकास कामे होतं नसल्याने इतर सदस्यांनी महिला सरपंच सौ विजया किशोर नागरगोजे यांच्या वर अविश्वास ठराव दाखल करण्यात आला होता. गावकरी आणि ग्रामपंचायत सदस्य देखील समाधानी नाहीत. त्यामुळे याबाबत अविश्वास ठराव घेण्यात आला होता शुक्रवारी (दि.११) याची सुनावणी पाटोदा तहसीलदार डि.बी.निलावड व निवडणूक निर्णय अधिकारी भालेराव मडम यांच्यासमोर

विशेष सभा,सकाळी ठीक ११ वा. ग्रा.प. येवलवाडी (पा) ता. पाटोदा जि.बीड येथे बोलवण्यात आली होती.सरपंच सौ. विजया किशोर नागरगोजे याच्या विरुद्ध मुंबई ग्रा.पं. अधिनियम १९५८ चे कलम ३५ अन्वये श्री चिमाकांत जगन्नाथ नागरगोजे व इतर.५ ग्रा.पं. सदस्यांची दाखल केलेल्या अविश्वास प्रस्तावा वर चर्चा व मतदान करण्यासाठी विशेष सभेसाठी उपस्थित होती.

सर्वप्रथम श्री चिंमाकांत जगन्नाथ नागरगोजे यांनी मांडलेल्या अविश्वास प्रस्तावाच्या ठरावास श्री.मधुकर रघुनाथ नागरगोजे यानी अनुमोदन दिले.त्यानंतर तहसिलदार निलावाड साहेबांनी इतर सर्व सदस्यांना त्यांची मत विचारली किवा. बोलण्याची इच्छा विचारात घेतली त्यावर त्यांनी त्यांच्या वतीने श्री. मधुकर रघुनाथ नागरगोजे यांच्या विचारास सहमती दर्शवली. तत्पूर्वी सरपंच सौ .विजया किशोर नागरगोजे यांनी मांडलेल्या अविश्वास ठरावास विरोध दर्शवत ग्रामपंचायतची कामे मी स्वतः पहात असून सर्व कामकाज योग्य पध्दतीने चालु असुन विकासाची कामे झाली आहेत व काही प्रगती पथावर आहेत असेही सांगितले. परंतु विरोधकांचे समाधान झाले नाही व ठराव

मतदानास टाकला.या महत्वाची बैठकीत श्रीम. नागरगोजे विजया किशोर (सरपंच) -श्री. नागरगोजे दशरथ किसन (सदस्य)- दशरथ

श्रीम. नागरगोजे रत्नमाला संतोष (सदस्य)श्री. चिमाकांत जगन्नाथ नागरगोजे (सदस्य)श्रीम. नागरगोजे चतुरा नारायण (सदस्य)श्रीम नागरगोजे इंदुबाई कारभारी (सदस्य) श्री. नागरगोजे मधुकर रघुनाथ (सदस्य)श्रीम. नागरगोजे उर्मिला राहुल सदस्य) श्री. दशरथ किसन नागरगोजे अशा प्रकारे अविश्वास प्रस्ताव प्रक्रियेत एकूण ८ मतदान झाले पैकी अविश्वास प्रस्ताव मंजूरच्या बाजूने - ६ मतदान, झाले तर अविश्वास प्रस्ताव मंजूर होउ नये या बाजून-२ मतदान झाले .सदर मतदान झाले नंतर अविश्वास प्रस्ताव ठरावाच्या बाजूने ६तर अविश्वास प्रस्ताव विरोधात २असू हात वर करुन मतदान साया न वरील प्र अविश्वास प्रस्ताव ६ विरुद्ध २ (३/४) बहुमताने पास झाला आहे

म्हणून सरपंच सौ. विजया किशोर नागरगोजे यांच्या विरुध्द अविश्वास प्रस्ताव विशेष सभेत दि ११ रोजी मंजूर झाला आहे .याबाबत उपस्थित असलेल्या सर्व ग्रामपंचायत सदस्यांना कळविण्यात आले.

असून कामे व्यवस्थीत झालेली आहेत.अविश्वास ठरावाच्या बाजूने ६तर त्या नंतर ठराव मंजुर होऊ नये म्हणून वि.अविश्वास ठरावाच्या विरोधात दोन सदस्यांनी मत नोंदवले.सदर सभेचे कामकाज पूर्ण झाल्याचे जाहीर करण्यात आले.

### सर्वच महिला सरपंच नामधारी

**पंचायत राज व्यवस्थेत महिलांना ५०टक्के आरक्षण असताना सरपंच,सभापती, सदस्य, नगराध्यक्ष, नगरसेवक महिला आहेत.या सर्वच ठिकाणी आ सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली सत्ता आहे.मात्र सर्वच महिला या फक्त नामधारी पदाधिकारी असुन त्यांचे पतीच कामधारी असुन तेच पदाधिकारी म्हणुन मिरवतात व शासकीय कार्यालयात व व्यासपीठावर सरपंच सभापती नगरसेवक नगराध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य म्हणून मिरवतात व संविधानाच्या चौकटीत महिलांच्या हक्कावर गदा आणत आहेत असे चित्र सर्वत्र दिसत आहे.**

# हरिनाम सप्ताह सामाजिक एकतेचे संस्कार केंद्र -राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

**प्रख्यात देवस्थान बेलेश्वर परिसरातील बेलगाव येथे बेलेश्वर संस्थान महंत महादेव महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत व हभप तुकाराम महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता झाली.यावेळी राजेंद्र मस्के यांनी भक्तांना संबोधीत करताना संबोधीत केले.**

### बेलगाव येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता



अखंड हरिनाम सप्ताह म्हणजे केवळ धार्मिक कार्यक्रम नाही, तर आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारा एक पवित्र सोहळा आहे. हरिनाम सप्ताहा दरम्यान घडणारे प्रभूचे नामस्मरण भजन, कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून भक्तिरस अनुभवता येतो.

नामस्मरणाने मनाला शांती मिळते, मानसीक तणाव दूर होण्यास मदत होते. ईश्वरावरील श्रद्धा वाढीस लागते. ईश्वरा पुढे सर्वजण समान असतात या भावनेतून अशा मंगलमय सोहळ्यात भेदभाव विसरून ईश्वर भक्त निरपेक्ष भावनेने सहभागी होतात. समाजामध्ये एकोपा, प्रेम आणि परस्परांत सहकार्य भावना निर्माण होते. ग्रामीण संस्कृतीत सप्ताहाला वेगळं महत्त्व आहे. गावो गावी होणारे अखंड हरिनाम सप्ताह सामाजिक एकतेचे संस्कार केंद्र व्हावेत अशी भावना शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी बेलगाव येथील अखंड हरिनाम सप्ताह सांगता समारंभ प्रसंगी भाविक भक्तांना संबोधित करताना व्यक्त केली आहे.

प्रख्यात देवस्थान बेलेश्वर परिसरातील बेलगाव येथे बेलेश्वर संस्थान महंत महादेव महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत व हभप तुकाराम महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता झाली. यावेळी अश्विन शेळके, दिलीप शेळके, जाधव अशोक, अंकुश शेळके,बबन शेळके, सुखदेव कोळपे, महेश सावंत, कल्याण पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

## निस्वार्थ मैत्रीचे उदाहरण म्हणजेच भक्त सुदामा- ह.भ.प.सचिन महाराज सपकाळ



बीड । प्रतिनिधी

गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेल्या जदीद जवळा ता. माजलगाव येथील अखंड हरिनाम सप्ताहातील संगीतमय भागवत कथेच्या समारोपास कथा प्रवक्ते भागवताचार्य सचिन महाराज सपकाळ यांनी आपल्या मधुर व रसाळ वाणीतून निस्वार्थ मित्र व भक्त सुदामाची कथा सांगितली पुढे बोलताना महाराज म्हणाले की सुदामाची गरीब परिस्थिती असताना देखील त्यांनी भगवान श्रीकृष्णास काहीच मागीतले नाही त्यामुळे श्रीकृष्ण सुदामाची मैत्री जगात आदर्शवत आहे. आजच्या धावपळीच्या युगात मैत्रीच्या नात्याला जपा, आई वडीलांची सेवा करा, व्यसने करू नका असा अनमोल संदेश त्यांनी भागवत कथेतून दिला.

कथेच्या समारोपास हजारो भाविकांची उपस्थिती होती. संपूर्ण परिसर राधे-राधेच्या नामघोषात तल्लीन झाला होता. भागवत कथा यशस्वी करण्यासाठी जदीद जवळा सप्ताह कमेटी व गावकऱ्यांनी अविरत मेहनत घेतली शेवटी महाप्रसादाने कथेची समाप्ती झाली.

## विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण व सांस्कृतिक कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**परळी । प्रतिनिधी**

तेज कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून भीम नगर येथे विद्यार्थी घडवण्याचे काम सुरू असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ जयंतीच्या निमित्ताने विविध स्पर्धा घेण्यात आले होत्या. त्यामध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. विनोद जगतकर, प्रमुख उपस्थिती माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, विधीतज्ञ ॲड. दिलीप उजगरे, संपादक बालाजी जगतकर, दत्ता सावंत, सय्यद सिराज, रमेश गायकवाड, भारत ताटे, अविनाश वाले, उपस्थित होते.मान्यवरा हस्ते स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आली. लिंबू चमचा स्पर्धेत पहिला माही कपील समींदरसवळे,सपना महादेव जगतकर, तेज प्रताप समिंदरसवळे, पोर्णिमा चंदूमणी समिंदरसवळे पृथ्वी संतोष पैठणे,बुध्दप्रिया विशाल कांबळे,चित्रकला स्पर्धेत प्रथम सलोनी,सिद्धधन साळवे,समर दशरथजगतकर,संगीत खुर्ची स्पर्धा पायल देवीदास,गायकवाड,गायत्री दुर्योधन साळवे.सामान्यू ज्ञान स्पर्धा प्रथम मन देविदास




गायकवाड,रोहीणी मुंजाजी दहिवाडे,जयसेन चंद्रमणी समिंदरसवळे, पृथ्वीराज बालाजी कसबे, रुद्राक्ष साळवे

सम्राट जगतकर यांना बक्षिसे वितरित करण्यात आली.

बक्षीस वितरण झाल्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी सादर करण्यात आली त्यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्य कलेचे प्रदर्शन केले. त्यावेळी या परिसरातील महिला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आणि लवकरच भीमनगर येथे भव्य अशी अभ्यासिका केंद्र उभारण्याचा निर्धार असल्याचेही लॉर्ड बुद्धा फाउंडेशनचे अध्यक्ष व सचिव यांनी कळवलं.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लॉर्ड बुद्धा फाउंडेशन व तेजस कोचिंग क्लासेसचे अध्यक्ष प्रताप समिंदरसवळे, संचालक सुमेर समिंदरसवळे, राज जगतकर, सत्यपाल जगतकर,धम्मपाल जगतकर, परमेश्वर अवचारे, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद तूपसमुद्रे त्यांनी केले.

# सशक्त, निरोगी व वैचारीक दृष्ट्या प्रगल्भ समाज निर्मिती हेच महापुरुषांचे स्वप्न होते- उद्घाटक डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त श्री क्रीडा व सांस्कृतिक व्यायाम मंडळ अंबाजोगाई यांच्यातर्फे भव्य बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्याचे उदघाटन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ राजेश इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले.**

यावेळी विचारमंचावर आधार माणुसकीचे कार्यवाहक ऍड संतोषजी पवार,प्रा डॉ वाघमारे, बालरोगतज्ञ डॉ संदीप मोरे, चेतन मोदी, तांदळे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना डॉ राजेश इंगोले यांनी श्री क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे बप्रवीण भैय्या देशमुख हे अंबाजोगाईतील बॅडमिंटन खेळाडूंना खूप मोठं व्यासपीठ उपलब्ध करून देत आहेत त्याबद्दल त्यांचं मनापासून कौतुक आणि आभार व्यक्त करत सांस्कृतीक, शैक्षणिक आणि क्रीडा संस्काराचे माहेरघर असलेल्या अंबानगरीत अशा दर्जेदार स्पर्धा आयोजित



केल्या जाव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली.

या देशातील महापुरुषांनी समाज हा वैचारीकदृष्ट्या निकोप, प्रगल्भ आणि शारीरिक दृष्ट्या निरोगी आणि सशक्त असला पाहिजे असे स्वप्न पाहिले होते. या स्वप्नपूर्तीसाठी हे क्रीडा मंडळ कार्यरत असल्याचा अभिमान असल्याचे सांगितले. खेळ हे माणसाचे आयुष्य केवळ समृद्ध बनवत नाहीत तर जीवन आनंददायी बनवतात आणि व्यक्तीला मानसिक दृष्ट्या कणखर बनवतात. कला आणि क्रीडा या दोन क्षेत्रात कुठलाच जातीभेद, धर्मभेद होत नाही तिथे फक्त कलाकार आणि खेळाडू हीच जात आणि धर्म असतो म्हणून कलाकार आणि खेळाडू हे जातीपातीच्या पलीकडे जाऊन जीवन जगतात आणि ही माणसे भारताला महासत्ता बनवतील असे प्रतिपादन डॉ राजेश इंगोले यांनी केले.

प्रा डॉ वाघमारे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त या स्पर्धांचे आयोजन ही नवसंकल्पना असल्याचे सांगत अशा स्पर्धा घेतल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले. आधार माणुसकीचे कार्यवाहक ऍड संतोष पवार यांनी खेळ हा माणसाला सशक्त निरोगी आणि आनंदी ठेवतो त्यामुळे खेळाडू सतत आनंदी समाधानी असतात असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन आणि पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. स्पर्धेच्या संयोजनासाठी श्री क्रीडा व्यायाम मंडळाच्या सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

### क्रीडा भारती स्थापना

व्हिएतनाम येथील हनोई येथे वर्ल्ड योगा स्पोर्ट्स फेडरेशन तर्फे नुकत्याच संपन्न झालेल्या वर्ल्ड आंतरराष्ट्रीय स्तरावरील योगासन स्पर्धेत व्दितीय क्रमांक मिळवून सिव्हर मेडल प्राप्त केल्याबद्दल क्रीडा भारती अंबाजोगाई च्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी अंबाजोगाई तालुका क्रीडा समन्वयक दत्ता देवकते, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक रमणजी सोनवळकर, ज्ञानेश मातेकर, सतिश बलुतकर,सह क्रीडा भारती चे. सदस्य तथा क्रीडाप्रेमी नागरिक उपस्थित होते.

### १८ तास अभ्यास करून डॉ.बाबासाहेब

यावेळी उमेश जेथलिया म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा जयघोष सर्वमान्य झाला आहे. आठरा तास अभ्यासामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाची आवड निर्माण होईल.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. एम.ए.कव्हळे म्हणाले की वाचनाने सत्य आणि असत्य यातील फरक समजतो. त्यामुळे मस्तक जाग्यावर राहून माणूस कोणाचा हस्तक होत नाही. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्तावित प्रा.संजय बागुल यांनी केले. सूत्रसंचालन बी. एस. बनसोडे यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रकाश गवते यांनी मानले.यावेळी विद्यार्थी - विद्यार्थीनी, प्राध्यापक, ग्रंथालय कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### बीडमध्ये उसळणार

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून सोमवार (दि१४) एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता अभिवादन रॅली काढली जाणार आहे. सदरील रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा इथपर्यंत काढली जाणार आहे. त्यानंतर सकाळी ९ वाजता पंचशील ध्वजारोहण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले जाणार आहे. सायंकाळी सहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक निघणार आहे. या मिरवणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचा रथ तसेच शहरातील जवळपास शंभर जयभीम महोत्सव उत्सव समित्या मिरवणुकीत सहभागी होणार आहेत.

असा असणार पोलीस बंदोबस्त

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीसाठी पोलीस अधीक्षक नवनीत यांनी तगडा पोलीस बंदोबस्त ठेवला असून तब्बल १०५० पोलीस कर्मचारी तैनात असणार आहेत. त्यामध्ये ११५ पोलीस कर्मचारी, दंगल नियंत्रण पथक ६, राज्य राखीव दल पथक, ८५० होमगार्ड असा पोलीस बंदोबस्त असणार आहे.

### हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतिक

आव्हान यात्रा कमिटीचे सरपंच नंदकिशोर कराडे सुभाष तात्या गणगे बबनराव कराडे विकास तात्या साळवे काका जाधव रजित ढोबळे कल्याण मोहोळकर सोमनाथ घुले सदिप कराडे जालीधर देवकर बारकु ढोबळे रामदास गणगे विठ्ठल शेळके संजय बावणे दादा साळवे महादेव चव्हाण संतोष आबा कराडे संतोष नरवडे विठ्ठल नरवडे बाबा पठाण सपत ढोबळे जाकीर शेख रफिक शेख सोमनाथ करडुळे सदाशिव गणगे बजरंग कराडे विजय डुकरे विठ्ठल जाधव नामदेव जाधव लक्षमण दिवटे बापुराव दिवटे सुदाम मोरे ललेश नरवडे गोकुळ नरवडे गोरख देवकर गोरख ढोबळे तुकाराम धनवे संतोष गोरे वेलचद कासवा राजेद जहागिरदार महादेव ससाणे लहु भवर संजय शिंदे पोपट करडुळे पोपट बेरड तुषार काळे दिपक कासवा रेवणनाथ फरतारे अशोक जाधव भरत आगवान माऊली चव्हाण घनश्याम नरवडे तोटे दादा अनिल सोनवणे नामदेव नरवडे माऊली घाडगे हिराजी बाबणे प्रशांत घुमरे कमिटीचे वतीने आवाहन केले आहे.

### मस्साजोग येथील नदीचे खोलीकरण

काम पुढे जात आहे. एक किलोमीटर परिसरात फेरफटका मारून त्यांनी कामाची पाहणी केली.

या एक किलोमीटरच्या कामांमध्ये दोन ठिकाणी बंधारे असल्याने मोठ्या प्रमाणात पाणीसाठा होणार आहे. शेतकऱ्यांना या पाण्याचा पुरेपूर उपयोग घेता येईल. यातून यावर्षीतील पिके जोमात येतील. पाणीसाठा निर्माण करण्याचे आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचे संतोष देशमुख यांचे स्वप्न यातून पूर्ण होईल.

नाम फाउंडेशन मार्फत नदी खोलीकरणासाठी दिलेले पोकलेन मशीन उत्तम रीतीने कार्यरत असून डिझेलचा खर्च देखील नाम फाउंडेशन करत असल्याने मस्साजोग विकासात नाम फाउंडेशनचा मोठा हातभार लागलेला आहे. त्यामुळे येथील शेतकरी नाम फाउंडेशनचे कायम ऋणी राहतील, असे शेतकरी या वेळेस म्हणत होते.या पाहणीच्या वेळी ॲड. अजित देशमुख यांच्यासह धनंजय देशमुख, भागवत कदम, तुषार देशमुख, गोवर्धन मस्के, मनोज देशमुख, यांच्यासह अन्य शेतकरी उपस्थित होते. काम आणखी जोमाने करण्यासाठी शेतकरी देखील लक्ष ठेवून आहेत.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
सोमवार दि.१४ एप्रिल २०२५
४

# रक्तचंदनाच्या एका झाडामुळे महाराष्ट्रातील शेतकरी झाला करोडपती

## रेल्वेला १ कोटी रुपये जमा करण्यास भाग पाडलं

यवतमाळ: यवतमाळच्या एका शेतकऱ्याला एका झाडाने रात्रीतून करोडपती केले. ही बाब कोणालाही पचनी पडणार नाही. मात्र, हे सत्य आहे. पुसद तालुक्यातील खुर्शी येथील पंजाब केशव शिंदे असे या शेतकऱ्याचे नाव आहे. पंजाब केशव शिंदे हे रक्तचंदनाच्या एका झाडामुळे करोडपती झाले.

नेमकं प्रकरण काय? : पंजाब केशव शिंदे यांच्या ७ एकरमध्ये वडिलोपार्जित शेतात एक झाड आहे. हे झाड कशाचे आहे हे शिंदे परिवाराला माहीतीही नव्हते. २०१३-१४ मध्ये वर्धा- नांदेड रेल्वेचा एक सर्वे झाला. त्यावेळी कर्नाटकातील काही लोक हा रेल्वे मार्ग पाहण्यासाठी आले असता त्यांनी हे झाड रक्तचंदनाचे असून त्याचे मूल्य समजावून सांगितले. त्यावेळेस शिंदे परिवार एकदम चक्रावून गेला.



त्यानंतर रेल्वेने भूसंपादन केले. मात्र, या झाडाचे मूल्य देण्याचे टाळाटाळ करत होते. त्यामुळे या परिवाराने या झाडाचे खाजगीमधून मूल्यांकन काढले. त्यावेळेस त्याचे मूल्यांकन ४ कोटी ९७ लाख रुपये निघाले. मात्र रेल्वेने ते देण्यास टाळाटाळ केली. शिंदे परिवार मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात हे प्रकरण दाखल केले. न्यायालयाने या झाडाच्या मूल्यांकनाच्या मोबदल्यात १ कोटी रुपये जमा करण्याचे आदेश दिले होते. आता त्यातील ५० लाख रुपये शेतकऱ्याच्या खात्यात जमा करायला सांगितले असून ते पैसे काढण्याची परवानगी शिंदे परिवाराला देण्यात आली आहे. दरम्यान, रक्तचंदनाच्या झाडाचं मूल्यांकन अजून झालेलं नाही. मूल्यांकन झाल्यानंतर ही किंमत जवळपास ५ कोटी रुपये होऊ शकते, असं याचिकाकर्त्याच्या वकीलांनी सांगितले. तसेच शिंदे यांना पूर्ण मोबदला देण्याच्या दृष्टीने त्या वृक्षाचे मूल्यांकन करण्याचे आदेश नागपूर खंडपीठाने दिलेले आहे. या प्रकरणावर न्यायमूर्ती अविनाश खरोटे आणि न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या समक्ष सुनावणी झाली.

रक्त चंदन हे एक आयुर्वेदिक औषधी झाड- रक्त चंदन हे एक आयुर्वेदिक औषधी झाड आहे. याला लाल चंदन असेही म्हणतात. शास्त्रीय भाषेत याचे नाव टेरोकार्पस सॅन्टलिनस आहे. हे झाड भारतात उगवते. रक्त चंदनाला वैज्ञानिक भाषेत टेरोकार्पस सेंटनांस असेही संबोधले जाते. मुळात रक्त चंदनाच्या झाडात लाल रंगाचा द्रव पदार्थ असतो, त्यामुळेच या झाडाला ''रक्त चंदन'' असे म्हटले आहे. या झाडाचे वाळलेले लाकुडही लाल रंगाचेच असते. चंदन सुवासिकतेसाठी प्रसिद्ध आहे पण या चांदनाप्रमाणे रक्त चांदनाच्या झाडाला मुळीच सुगंध येत नाही. हाडे किंवा सांधे दुखू लागल्यावर ती उगाळून लावल्यास ओढ बसून वेदनेची तीव्रता कमी होते, त्वचेवरील कठीण आणि दीर्घकालीन पिग्मेंटेशन स्पॉट्स, चट्टे आणि मुरुमे काढून टाकतो आणि हलके करतो.

# मोगरा फुलशेती करा; मिळेल भरघोस नफा



गेल्या काही दिवसांपासून राज्यात फुल शेतीला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. यातही शेतकरी शेवंती, गुलाब, झेंडू या फुलांकडे अधिक प्रमाणात वळत आहे. काही प्रमाणात मोगऱ्याच्या फुलांची देखील शेतकरी लागवड करत आहे. मात्र, इतर फुलांपेक्षा मोगरा लागवडीचे प्रमाण कमी आहे. मोगऱ्याचे फुल हे दररोज देव पूजेसाठी, सणसमारंभांसाठी तसेच सौंदर्य प्रसाधने उद्योग, केसांचे तेल यामध्ये वापरले जाते. ज्यामुळे मोगऱ्याच्या फुलांना मोठी मागणी असते.

कधी होते लागवड?

शेती तज्ज्ञांनी मोगऱ्याच्या शेतीला व्यावसायिक शेती पीक मानले आहे. मोगऱ्याचे झाड १० ते १५ फूट उंचीपर्यंत वाढते. त्याची सदाहरित पाने दोन ते तीन इंच लांब आणि देठ पातळ असते. मोगऱ्याची फुले पांढरी असून, ती अतिशय सुंदर आणि सुवासिक असते. मोगऱ्याच्या झाडाला मार्च ते जून महिन्यात फुले येतात. मोगऱ्याच्या फुलाचा वापर विशेषत: हार, सजावट आणि देवाच्या पूजेमध्ये केला जातो. मोगऱ्याची लागवड जून ते नोव्हेंबर या कालावधीदरम्यान केव्हाही केली जाऊ शकते.

किती मिळतो दर?

मोगऱ्याच्या फुलांना २५० रुपये प्रति किलोचा भाव सहज मिळतो. तर लग्न किंवा सण-समारंभाच्या काळात ही ४०० रुपये प्रति किलोपर्यंत विकली जातात. मोगऱ्याच्या फुलांचा उपयोग परफ्यूम, साबण, क्रीम, तेल, शॅम्पू आणि डिटर्जंट पावडरमध्ये सुगंधासाठी केला जातो. भारतात याची लागवड प्रामुख्याने पंजाब, आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि हरियाणामध्ये केली जाते.

कसे लागते हवामान?

मोगऱ्याच्या लागवडीसाठी उष्ण व दमट हवामान उत्तम मानले जाते. त्याचवेळी, त्याच्या काही जाती अगदी थंड हवामानात देखील सहजपणे वाढू शकतात. रोपाच्या वाढीसाठी सर्वात योग्य तापमान २४ अंश सेल्सिअस ते ३२ अंश सेल्सिअस तापमान आवश्यक असते. हिमाचल प्रदेश, हरियाणा, बिहार, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात या राज्यांमध्ये नवीन वाणांपासून चांगली कमाई करता येते.

नियमित पाणी देणे आवश्यक

मोगऱ्याच्या झाडांना नियमित पाणी द्यावे लागते. उन्हाळी हंगामात आठवड्यातून किमान दोनदा पाणी द्यावे. मध्यम हवामानात आठवड्यातून एकदाच पाणी देणे पुरेसे असते. मोगऱ्याला हंगाम आणि जमिनीनुसार सिंचन आवश्यक असते.

मोगऱ्याचे रोप लावल्यानंतर नऊ ते दहा महिन्यांनी फुले येण्यास सुरुवात होते. तर काही जातींमध्ये वर्षभर झाडांना फुले येतात. बहुतेक प्रजातींमध्ये फुलांचा काळ हा मार्च ते ऑक्टोबर महिन्यापर्यंत असतो. सकाळी सूर्याची किरणे फुलांवर पडण्याआधी फुले तोडली तर उत्तम असते. त्यामुळे त्यांचा सुगंध टिकून राहण्यास मदत होते.

# पाणंद रस्ते योजना अधिक प्रभावीपणे राबविणार

मुंबई : ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी महत्त्वाकांक्षी 'मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना' अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी दिले आहेत.


मंत्रालयात वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या दालनात आयोजित मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेचा आढावा घेताना ते बोलत होते. यावेळी आमदार प्रताप अडसड, नाना पटोले, विनोद अग्रवाल, अभिमन्यू पवार, राजू तोडसाम, राजेंद्र पाटील आदी लोकप्रतिनिधी उपस्थित होते. मंत्री गोगावले म्हणाले, योजनेतील कामे वेळेत व दर्जेदार व्हावीत, केंद्र सरकारकडून प्रलंबित निधीसाठी पाठपुरावा करण्यात यावा, तसेच रोहयो अंतर्गत न होणारे रस्त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत. शेतीच्या विकासासाठी आणि शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी योग्य रस्ता सुविधा मिळण्यासाठी ही योजना अत्यंत उपयुक्त आहे. कामांची गुणवत्ता राखत ती वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी विशेष लक्ष द्यावे. राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले, ज्या ठिकाणी मजूर उपलब्ध नाहीत, त्या ठिकाणी कामांसाठी पर्यायी समायोजन करावे. मजूर उपलब्ध नसणे ही अंमलबजावणीतील मोठी अडचण असून, त्यावर तातडीने उपाययोजना करावी. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा मजबूत करून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.



# पुंगनूर गाईंच्या दूधात औषधी गुणधर्म; मात्र गाय होतेय नामशेष

पुंगनूर गाय ही मुख्यतः आंध्र प्रदेशमधील चित्तूर जिल्ह्यात आढळते. या गायीचे वैशिष्ट्य म्हणजे ही गाय केवळ पाच किलो चाऱ्यासह दररोज तीन लिटर दूध देण्यास सक्षम आहे. अशा परिस्थितीत जगातील सर्वात लहान गाय म्हणून पुंगनूर गायची ओळख आहे.

भारतात गायींच्या अनेक उत्कृष्ट जाती आढळतात. देशात गायींच्या काही जाती आहेत ज्या हळूहळू नामशेष होत आहेत. गायींच्या नामशेष होणाऱ्या जातींमध्ये पुंगनूर गाय आहे. ही गाय जगातील सर्वात लहान गायींपैकी एक आहे. गायीची ही उत्कृष्ट जात दक्षिण भारतात विकसित करण्यात आली आहे. ही गाय नामशेष झाल्यामुळे आंध्र प्रदेशात मोठ्या प्रमाणावर तिच्या संवर्धनावर काम केले जात आहे, जेणेकरून तिला नामशेष होण्यापासून वाचवता येईल. पुंगनूर गाय ही मुख्यतः आंध्र प्रदेशमधील चित्तूर जिल्ह्यात आढळते. या गायीचे वैशिष्ट्य म्हणजे ही गाय केवळ पाच किलो चाऱ्यासह दररोज तीन लिटर दूध देण्यास सक्षम आहे.



लहान आकारासाठी प्रसिद्ध : पुंगनूर गायीची उंची जवळपास कुत्र्याएवढी असते. म्हणजेच अडीत ते तीन फुट असते. पशुपालकांना ही गाय पाळणे खूप सोपे आहे. कारण ती चारा जास्त प्रमाणात खात नाही. ती एका दिवसात पाच किलो चारा खाते आणि तीन लिटर दूध देते. पुंगनूर गायीची जात जुनी मानली जाते. ही गाय देशातील जवळपास सर्वच राज्यात सहज पाळता येते. पुंगनूर गाईचे दूध हे औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण : पुंगनूर गाईचे दूध हे औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. वास्तविक, त्याच्या दुधामध्ये सुमारे ८ टक्के फॅट असते, जे मानवी शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. त्याच वेळी, इतर गायींच्या दुधात ३ ते ३.३५ टक्के फॅटचे प्रमाण आढळते.पुंगनूर गाय कशी ओळखावी : पुंगनूर गाय/पुंगनूर गायीची उंची खूपच लहान असते. अशा स्थितीत या गायीचा मागचा भाग किंचित खाली झुकलेला असतो. याशिवाय या गायीची शिंगे वाकडी असून तिची पाठ पूर्णपणे सपाट असते. पुंगनूर गायींचा बहुतेक रंग पांढरा असतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६१ : प्रिन्स सेसी या शास्त्रज्ञाने प्रथमच दुर्बिणीसाठी टेलिस्कोप ही संज्ञा वापरली.
१६६५ : सुप्रसिद्ध पुरंदरच्या वेढ्यामधे दिलेरखान पठाणने वज्रमाळ किल्ला जिंकला.
१७३६ : चिमाजीअप्पांनी मोघल बादशहाचा हस्तक जंजिरा येथील सिद्दीसाताचा पराभव करुन मराठी सत्तेचा दरारा बसविला.
१८६५ : जॉन विल्कस बूथने अब्राहम लिंकनवर गोळी झाडली. लिंकन दुसर्या दिवशी मृत्यू पावला.
१९१२ : आर.एम.एस. टायटॅनिकची हिमनगाशी टक्कर. बोटीला भगदाड पडून बुडु लागली.
१९४४ : मुंबईच्या बंदरात उभ्या असलेल्या बोटीवर महाभयानक विस्फोट. ३०० ठार. त्याकाळच्या २ कोटी पाउंडचे नुकसान.
१९४४ : मुंबई गोदीत उभ्या असलेल्या 'फोर्ट स्टिकिन' या मालवाहू जहाजावर दुपारी ४ वाजुन ५ मिनिटांनी भीषण स्फोट होऊन ३०० जण ठार झाले आणि (त्याकाळच्या) सुमारे २ कोटि पौंडा इतके आर्थिक नुकसान झाले.
१९८६ : बांगलादेशमध्ये १ किलो वजनाच्या अतिप्रचंड गारांचा वर्षाव. ९२ ठार. गारांच्या वजनाचा हा विक्रम अजुन अबाधित आहे.
१९९५ : टेबल टेनिसमधे सलग ६,६७० रॅलीज करण्याचा जागतिक विक्रम डॉ. रमेश बाबू यांनी पुण्यात नोंदवला.
२००८ : भारतातील कोलकत्ता व बांगलादेशाची राजधानी ढाका या दोन देशादरम्यान रेल्वे सेवा सुरु करण्यात आली.
२०१० : पश्चिम बंगाल, उडीसा, झारखंड आणि बिहार राज्यात आलेल्या चक्रवर्ती वादळामुळे सुमारे १२३ लोकांचे निधन झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६२९ : क्रिस्टियन हायगेन्स डच गणितज्ञ, खगोलविद्? आणि पदार्थवैज्ञानिक, लंबकाच्या घड्याळाचा शोध (मृत्यू: ८ जुलै १६९५)
१६७५ : छत्रपती शिवाजी महाराज यांचे धाकटे पुत्र छत्रपती राजाराम भोसले यांच्या दुसऱ्या पत्नी राणी ताराबाई भोसले यांचा जन्मदिन.
१८३३ : व्हिक्टोरिया क्रॉसचे प्राप्तकर्ता रॉस लोव्हिस मंगल्स व्हीसी यांचा जन्मदिन.
१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाचे खंदे नेते, अस्पृश्य समजल्या जाणार्या जातितील पहिले मॅट्रिक व पहिले पदवीधर, इंग्लंडमध्ये वकिलीतील बॅरिस्टरची परीक्षा दिली आणि अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवली. (मृत्यू: ६ डिसेंबर १९५६)
१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार.
१८९८ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या आझाद हिंद सरकारमधील प्रसिद्धी व प्रचार प्रमुख सुब्बीर अप्पादुराई यांचा जन्मदिन.
१९०७ : भारतीय कम्युनिस्ट चळवळीचे प्रारंभिक नेते व माजी सरचिटणीस पूरणचंद जोशी यांचा जन्मदिन.
१९१४ : शांता हुबळीकर अभिनेत्री (मृत्यू: १७ जुलै १९९२)
१९१९ : शमशाद बेगम पार्श्वगायिका (मृत्यू: २३ एप्रिल २०१३)
१९२२ : उस्ताद अली अकबर खाँ तथा खाँसाहेब मैहर घराण्याचे जागतिक कीर्तीचे सरोदवादक, पद्?मविभूषण (१९८९), मॅकआर्थर फेलोशिप, संगीत नाटक अकादमी फेलोशिप, नॅशनल हेरिटेज फेलोशिप (मृत्यू: १८ जून २००९ सॅन अन्सेल्मो, कॅलिफोर्निया, यू. एस. ए.)
१९२७ : द. मा. मिरासदार विनोदी लेखक (मृत्यू: )
१९३३ : सर्जनशील कला अकादमीचे संस्थापक-प्राचार्य अनिल कुमार दत्ता यांचा जन्मदिन.
१९४२ : मार्गारेट अल्वा केंद्रीय मंत्री व राजस्थानच्या राज्यपाल
१९४३ : रामदास फुटाणे वात्रटिकाकार
१९५७ : भारतीय मल्याळम स्त्रीवादी लेखिका आणि नाटककार के. सरस्वती अम्मा यांचा जन्मदिन.
१९५७ : भारतीय अवकाश वैज्ञानिक आणि भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे अध्यक्ष तसचं, विक्रम साराभाई स्पेस सेंटर आणि लिक्विड प्रोपल्शन सिस्टम सेंटरचे माजी संचालक कैलासावादिव शिवन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५० : भारतीय तत्त्ववेत्ते योगी रमण महर्षी तथा वेंकटरमण अय्यर समाधिस्थ झाले. चैत्र व. १२ शके १७८३ (जन्म: ३० डिसेंबर १८७९)
१९६२ : सर मोक्षगुंडम्? विश्वेश्वरैया, भारतीय अभियंता.
१९६२ : भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या अभियंते, विद्वान, मुत्सद्दी आणि मैसूर संस्थानचे दिवाण
१९६३ : केदारनाथ पांडे तथा राहूल सांकृतायन इतिहासकार (जन्म: ९ एप्रिल १८९३)
१९९७ : चंदू पारखी चित्रपट आणि नाट्य अभिनेते (जन्म:)
१९९८ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक, छायाचित्रकार व पटकथालेखक नितीन बोस यांचे निधन.
२०१३ : राम प्रसाद गोएंका उद्योगपती (जन्म: १ मार्च १९३०)

# सेंद्रिय शेतीसाठी जीवामृत कसे तयार करावे?

सर्व प्रथम, गोमूत्र एका डब्यात ठेवा आणि त्यात ५ किलो शेण घाला. गाईचे शेण लघवीत मिसळावे आणि कोणत्याही प्रकारची गुठळी राहणार नाही. यानंतर दुसऱ्या भांड्यात ३ किलो गूळ पाण्यात विरघळवून घ्या. (तयार मिश्रणात असलेले बॅक्टेरिया अधिक सक्रिय व्हावेत म्हणून गुळाचा वापर केला जातो) गूळ अशा प्रकारे मिसळा की कोणत्याही प्रकारची गुठळी राहणार नाही.

शेतमालाचा खर्च दिवसेंदिवस वाढत चालला आहे, मात्र शेतकऱ्यांचे उत्पन्न नाही. शेतकरी बांधवांनो, शेतीत नफा मिळविण्याचे दोनच मार्ग आहेत, एक म्हणजे खर्च कमी करणे आणि दुसरे म्हणजे आपले पीक विकून जास्त भाव मिळवणे. भाव देणे हे शेतकऱ्याच्या हातात नसून त्याचा खर्च कमी करणे हे शेतकऱ्याच्या हातात आहे, त्यासाठी शेतकऱ्याला सेंद्रिय शेतीकडे वाटचाल करावी लागेल. म्हणूनच किसान समाधान तुमच्या सर्वांसाठी सेंद्रिय कीटकनाशक बनवण्याची पद्धत घेऊन आले आहे.

कृती : सर्व प्रथम, गोमूत्र एका डब्यात ठेवा आणि त्यात ५ किलो शेण घाला. गाईचे शेण लघवीत मिसळावे आणि कोणत्याही प्रकारची गुठळी राहणार नाही. यानंतर दुसऱ्या भांड्यात ३ किलो गूळ पाण्यात विरघळवून घ्या. (तयार मिश्रणात असलेले बॅक्टेरिया अधिक सक्रिय व्हावेत म्हणून गुळाचा वापर केला जातो) गूळ अशा प्रकारे मिसळा की कोणत्याही प्रकारची गुठळी राहणार नाही. आता विरघळलेला गूळ शेण असलेल्या मूत्रात मिसळा. हे दोन्ही मिश्रण नीट ढवळून घ्यावे. आता शेवटी २ किलो बेसन घाला. काही वेळ मिश्रण ढवळत राहा. मिश्रण चांगले मिसळले की ते एका मोठ्या कंटेनरमध्ये स्थानांतरित करा. आणि काही वेळ काठी घेऊन चालत राहा. यानंतर त्यात समान प्रमाणात पाणी घाला. त्याचप्रमाणे, सर्व मिश्रण ७ दिवस सोडा, परंतु ते सात दिवस वेळोवेळी काठीने ढवळत राहा. सात दिवसांनी तुम्ही ते झाडांवर वापरू शकता. हे कीटकनाशक झाडांवरील बुरशी मारतात. अशा प्रकारे तुम्ही तुमच्या शेतीवरील खर्च कमी करू शकता.



# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अद्वितीय कार्याने जगाला प्रभावित केले

## मनपा उपआयुक्त रवींद्र जोगदंड यांचे प्रतिपादन

बीड । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान आणि विचार केवळ भारतापुरते मर्यादित न राहता आता जागतिक स्तरावर ओळखले जात आहेत. त्यांना एकेकाळी 'भारतरत्न' म्हणून गौरवले जात असे, तर आज त्यांचे तत्त्वज्ञान आणि कार्य 'विश्वरत्न' या उच्च दर्जाच्या पदवीने सन्मानित केले जात असल्याचे, प्रतिपादन छत्रपती संभाजी नगर येथील महानगरपालिकाचे उपआयुक्त मा.रवींद्र जोगदंड यांनी व्यक्त केले. तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने शनिवार दि.१२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते, यावेळी प्रमुख वक्ते म्हणून मा.रवींद्र जोगदंड बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्राचार्य अनंद खरात, मा.वैजनाथ निर्मळ, प्रा.राम गायकवाड, प्रा.अर्जुन राठोड आदींची उपस्थिती होती.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य प्रा.डी.जी निकाळजे यांनी, 'महापुरुषांच्या विचारांतून युवा पिढीला विविध क्षेत्रांसाठी प्रेरणा मिळावी' या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे,'' असे नमूद केले.रवींद्र जोगदंड यांनी, डॉ.आंबेडकरांच्या जीवनातील संघर्ष, समाजपरिवर्तन, शिक्षण आणि संविधान निर्मितीतील योगदानावर प्रकाश टाकला. बाबासाहेबांच्या संविधाननिर्मितीतील योगदानाने भारताच्या लोकशाहीला बळकटी आणली, तर त्यांच्या सामाजिक न्यायाच्या विचारांनी जागतिक स्तरावर मानवाधिकार चळवळींना प्रेरणा दिली. आज जगभरातील विद्यापीठांमध्ये त्यांच्या विचारांचा अभ्यास केला जातो, तर अनेक आंतरराष्ट्रीय संस्था त्यांच्या तत्त्वज्ञानाचा आदर करतात. असे सांगत ते पुढे म्हणाले की, एक काळ असा होता, जेव्हा बाबासाहेबांना आपण 'भारतरत्न' म्हणत होतो. मात्र, आजच्या घडीला बाबासाहेबांचे विचार, तत्त्वज्ञान आणि कार्य यांना 'विश्वरत्न' या उच्चपदस्थ पदवीने संबोधले जात आहे. एक काळ असा होता, जेव्हा बाबासाहेबांची जयंती ही फक्त फक्त भारतामध्येच साजरी केली जात होती. आता संपूर्ण जगभरात साजरी केली जात आहे, असे सांगत बाबासाहेबांच्या जीवनातील विविध पैलूंसंबंधी आपले विचार व्यक्त केले आणि जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय भाषणात प्रा.प्रदीप रोडे म्हणाले की, 'इतरांना ज्ञान देताना आपल्या स्वतःच्या ज्ञानात भर पडते. या ज्ञानवर्धनाच्या उद्देशाने आपण सर्व येथे एकत्रित आलो आहोत. महापुरुषांच्या कृतीचे आदर्श आपल्या दैनंदिन व्यवहारात कसे आणावेत याचा सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.योगिता लांडगे यांनी केले. यावेळी तुलसी समूहातील सर्व शाळा, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जयभीम महोत्सवात १८ तास वाचन

### उपक्रम: विद्यार्थ्यांनी नोंदविला उत्स्फूर्त प्रतिसाद



बीड । प्रतिनिधी

राज्याला आदर्श घालून दिलेल्या बीड जयभिम महोत्सवात १८ तास वाचन करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. वाचन केल्याने मस्तक सुधारते आणि सुधारलेले मस्तक कोणापुढेही नतमस्तक होत नाही. त्यामुळे १८ तास वाचनाचा उपक्रम राबविण्यात आला असून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालवधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने गुरुवार (दि.११) एप्रिल रोजी तुलसी संगणक शास्त्र महाविद्यालयात १८ तास वाचन उपक्रम राबविण्यात आला होता.

वाचन समितीचे सुमिध जोगदंड, प्रा. अशोक गायकवाड, स्वप्नील चोपडे यांनी १८ तास वाचन यासाठी सुयोग्य नियोजन केले होते.या उपक्रमात वंदनाताई काशिनाथ वाघमारे,मंदाताई रोहीदास मस्के,प्रतिभा रंजीत वाघमारे,पंचशिला भास्कर सरपते,शीतल बाबासाहेब पालके व शेकडो विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता. १८ तास वाचनासाठी बसलेल्या विद्यार्थ्यांना जयंती उत्सव समितीचे प्रा.अशोक गायकवाड,सुमेध जोगदंड,स्वप्नील चोपडे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देण्यात आले.

## थोडक्यात



### शिवसेना सदस्य नोंदणीला माजलगावात उत्स्फूर्त प्रतिसाद

माजलगाव। प्रतिनिधी

शिवसेना सदस्य नोंदणी माजलगाव तालुक्यातून उस्फूर्तपणे प्रतिसाद मिळत आहे. शिवसेना पक्षप्रमुख, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार, तसेच शिवसेना सचिव संजय मोरे, शिवसेना उपनेते व मराठवाडा संपर्कप्रमुख अर्जुनभाऊ खोतकर , आणि मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे बीड जिल्हा अध्यक्ष ह भ प भागवताचार्य सर्जेराव महाराज काशीद, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष उमेश मोगरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक १२ एप्रिल रोजी हनुमान जयंतीच्या मुहूर्तावर सकाळी दहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवसेना सदस्य नोंदणी चा शुभारंभ करण्यात आला यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवा सेनेचे तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख शारदाताई डोईजड रामेश्वर काशीद प्रशांत टमके माऊली वाघमारे योगेश उगले,आदी नी दिवसभर शिवसेना सदस्य नोंदणी केली जनतेतून उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

### आमदार-खासदारांच्या पगारी व पेन्शन बंद करा-गणेश शेवाळे

पाटोदा । प्रतिनिधी

''देशाची आर्थिक स्थिती आणि सर्वसामान्य जनतेचे प्रश्न लक्षात घेता, आमदार-खासदारांना मिळणाऱ्या पगारी व पेन्शनसारख्या सुविधा तात्काळ बंद करण्यात याव्यात,'' अशी ठाम भूमिका सामाजिक कार्यकर्ते गणेश शेवाळे यांनी मांडली आहे.शेवाळे म्हणाले, ''जेव्हा देशातील शेतकरी, बेरोजगार तरुण, वृद्ध आणि गरजू नागरिक पुरेशा सुविधा न मिळाल्याने त्रस्त आहेत, तेव्हा लोकप्रतिनिधींना आजीवन पेन्शन व विविध भत्ते मिळणे अन्यायकारक आहे. देशाच्या प्रगतीसाठी खर्च कमी करून तो पैसा शिक्षण, आरोग्य आणि शेतीच्या विकासासाठी वापरणं गरजेचं आहे.''ते पुढे म्हणाले की, ''सरकारने सर्वसामान्य जनतेसाठी कटोतीचे निर्णय घेतले, मग जनतेचे प्रतिनिधी मात्र सवलतींचा उपभोग का घेतात? ही दुहेरी भूमिका बंद झाली पाहिजे.

# सपना खरात यांचा भीमगीतांचा कार्यक्रम

### आ.सुरेश धस यांची विशेष उपस्थिती



आष्टी। प्रतिनिधी

आष्टीतील 'भीम संदेश पर्व' २०२५ या कार्यक्रमात आ. सुरेश धस सहभागी झाले होते. आष्टीतील भीमजयंती महोत्सव आयोजन समितीच्यावतीने 'भीम संदेश पर्व २०२५'चे आयोजन करण्यात आले होते.दोन दिवसांवर विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती आली आहे. या जयंतीनिमित्त हा सोहळा पार पडत आहे.या सोहळ्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आणि व्याख्यानांचे आयोजन केले होते. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात सोहळ्याच्या निमित्ताने भीम गीतांच्या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

यावेळी महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध गायिका सपनाताई खरात यांनी उपस्थित सर्वांना त्यांच्या गायकीने प्रभावित केले.विविध गीतांच्या माध्यमातून त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन प्रसंग आणि विचार सर्वांसमोर सादर केले.सात दिवस हा सोहळा पार पडला. शेवटच्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढून या सोहळ्याची सांगता होणार आहे. याप्रसंगी ज्येष्ठ नेते अरुण निकाळजे, जयंती महोत्सवाचे अध्यक्ष परिवंत गायकवाड, अरुण कांबळे, राहुल वाल्हेकर, सीताराम घोडके, नगरसेवक भारत मुरकुटे, माजी नगरसेवक दीपक निकाळजे, माजी नगरसेवक मनोज सुरवसे, राजू निकाळजे, नवनाथ लोंढे, ॲड.ससाणे यांच्यासह भीमसैनिक महिला व नागरिक मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

# आमचा आजही सर्वांगिण विकास नाही

### जयभीम महोत्सव: धम्मसंगिनी रमागोरख यांचे परखड मत

बीड। प्रतिनिधी

भारतीय संविधान जगात श्रेष्ठ असून प्रत्येक घटकाला त्यामुळे न्याय मिळाला आहे. एवढे महान कार्य घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. परंतू संविधान राबविणाऱ्या यंत्रणेकडून आजही आमच्या आर्थिक सशक्तीकरणासाठी ठोस भूमिका घेतल्याचे दिसत नाही.त्यामुळे आमचा सर्वांगिण विकास झाला आहे असे म्हणता येणार नाही. असे परखड मत धम्मसंगिनी रमागोरख यांनी व्यक्त केले.



बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे, दि.४ ते १४ एप्रिल रोजी या कालावधीत जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने शनिवार (दि.१२) एप्रिल रोजी व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले होते.त्यावेळी धम्मसंगिनी रमागोरख बोलत होत्या.या व्याख्यान माला कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मैनाताई बोराडे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून मनिषा तोकले, रामगोरख म्हणाल्या की,आंबेडकरवादी महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक सशक्तीकरणाचा प्रश्न म्हणावा तेवढा सुटलेला नाही.धम्मसंगिनी असही म्हणाल्या की, बाबासाहेबांनी आपल्याला बौद्ध धम्म देवून प्रज्ञा, शिल, करुणा रुजविली आहे.तसेच संविधान लिहून हजारो वर्षांची सनातनी व्यवस्था लथाडून आपल्याला माणूस म्हणून जगण्याचा हवे.असे परखड मत धम्मसंगिनी रमागोरख यांनी व्यक्त केले.या व्याख्यान मालेच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माया दिवाण यांनी केले. सूत्रसंचालन शैलजा चिलवंत तर आभार प्रदर्शन मायाताई चोपडे-सोनवणे यांनी मानले.दरम्यान जयभीम महोत्सव यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने मोलाचे परिश्रम घेतले.

# झाडावरच टोमॅटो पिकुन गळु लागले; भाव नसल्याने उत्पादन खर्चही निघेना

लिंबागणेश। प्रतिनिधी

उन्हाची तिव्रता वाढल्याने टोमॅटो पिकाला याची झळ बसल्याने झाडावरच टोमॅटो पिकुन गळु लागले आहेत. टोमॅटोचे दर घसरले असुन यातुन शेतातील खत, बियाणे, मजूरी याचा प्रचंड खर्च असुन टोमॅटो अवघ्या ५ ते १० रूपये किलो दराने विकावे लागत असुन उत्पादन खर्च देखील निघत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.बाजारातील टोमॅटोची आवक वाढल्याने दरात घसरण झाल्याचे बोलले जाते. उत्पादन खर्चापेक्षाही कमी भाव मिळत असल्याने शेतकरी हवालदिल झाला असुन विक्रीला परवडत नसल्याने झाडावरच पिकुन गळत असल्याचे सांगत टोमॅटो बरोबरच कष्टही मातीमोल ठरल्याची उद्विग्न प्रतिक्रिया मुळुकवाडी येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक मल्हारी ढास यांनी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलताना दिली.



गेल्या वर्षी टोमॅटोला जवळपास १०० रूपये किलो भाव मिळाला होता. म्हणून टोमॅटोची लागवड केली. एकरी सव्वा लाख रुपयांपर्यंत खर्च आला. टोमॅटोचे पिक सुद्धा चांगले आले आहे.मात्र भाव नसल्यामुळे टोमॅटो विक्रीसाठी काढायला सुद्धा परवडत नाही. १०० रूपये कॅरेट भाव असुन चाकण,पुणे, नारायणगाव याठिकाणी विक्री साठी पाठवतोत.पण कॅरेट मागे वाहतुक खर्च ६० रूपये, टोमॅटो तोडण्यासाठी महिला मजूर ३०० रूपये रोज तसेच आडत, कमिशन आदी मिळुन ८०-९० रुपये खर्च येतो. म्हणून टोमॅटोची झाडावरच पिकुन गळती होत आहे. चांगला भाव मिळाला असता तर दैना फिटली असती परंतु आपलं नशीब फुटकं म्हणून सहन करायचं अशी मनातली सल अशोक ढास यांनी बोलून दाखवली.

# बेलगाव येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

बीड। प्रतिनिधी

प्रख्यात देवस्थान बेलेश्वर परिसरातील बेलगाव येथे बेलेश्वर संस्थान महंत महादेव महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत व हभप तुकाराम महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता झाली.यावेळी राजेंद्र मस्के यांनी भक्तांना संबोधीत करताना संबोधीत केले.

अखंड हरिनाम सप्ताह म्हणजे केवळ धार्मिक कार्यक्रम नाही, तर आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारा एक पवित्र सोहळा आहे.हरिनाम सप्ताहा दरम्यान घडणारे प्रभूचे नामस्मरण भजन, कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून भक्तिरस अनुभवता येतो.नामस्मरणाने मनाला शांती मिळते, मानसीक तणाव दूर होण्यास मदत होते. ईश्वरावरील श्रद्धा वाढीस लागते. ईश्वरा पुढे सर्वजण समान असतात या भावनेतून अशा मंगलमय सोहळ्यात भेदभाव विसरून ईश्वर भक्त निरपेक्ष भावनेने सहभागी होतात. समाजामध्ये एकोपा, प्रेम आणि परस्परांत सहकार्य भावना निर्माण होते. ग्रामीण संस्कृतीत सप्ताहाला वेगळं महत्त्व आहे. गावो गावी



होणारे अखंड हरिनाम सप्ताह सामाजिक एकतेचे संस्कार केंद्र व्हावेत अशी भावना शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी बेलगाव येथील अखंड हरिनाम सप्ताह सांगता समारंभ प्रसंगी भाविक भक्तांना संबोधित करताना व्यक्त केली आहे.प्रख्यात देवस्थान बेलेश्वर परिसरातील बेलगाव येथे बेलेश्वर संस्थान महंत महादेव महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत व हभप तुकाराम महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता झाली. यावेळी अश्विन शेळके, दिलीप शेळके, जाधव अशोक, अंकुश शेळके,बबन शेळके, सुखदेव कोळपे, महेश सावंत, कल्याण पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

# वडवणी येथील भीम जन्मोत्सवाचे कार्यक्रम जाहीर

### उद्याच्या विविध कार्यक्रमाला हजारोच्या संख्येने उपस्थित रहा - राहुल घाडगे

वडवणी । प्रतिनिधी

विश्वरत्न, परमपूज्य, बोधिसत्व, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती वडवणी यांच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या भीम जन्मोत्सवाचे कार्यक्रम कालच जाहीर करण्यात आले असून उद्या विविध कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले आहे. तरी या सर्वच कार्यक्रमाला वडवणी शहरासह तालुक्यातील तमाम समाजबांधवा सह बहुजन समाजाने उपस्थित राहावे. असे आव्हान वडवणी येथील जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष व नगरपंचायतीचे नगरसेवक राहुल घाडगे यांनी केली आहे.

विश्वरत्न परमपूज्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वडवणी शहरात विविध सामाजिक कार्यक्रम घेऊन जयंती उत्साहात पार पडणार आहे. तर याबाबतचे कार्यक्रम देखील जाहीर करण्यात आले आहेत. आज मध्यरात्री रात्री ११.३० वा. वडवणी शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत भव्यदिव्य अशी भीमज्योत रॅली काढण्यात येणार आहे. तर उद्या सकाळी ठीक ९ वा. लोकशाहीर



अण्णाभाऊ साठे चौक ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत भव्य दिव्य अशी मोटरसायकल रॅली काढण्यात येणार आहे. तर उद्या ठीक १० वा. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत निळा ध्वजाचे ध्वजारोहणाचा कार्यक्रम होणार आहे. तर लगेच याठिकाणी ११ वा. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी महास्नेह भोजनाचा कार्यक्रम होणार आहे. हा भोजनाचा कार्यक्रम सकाळी ११ ते ७ वाजेपर्यंत असणार आहे. तर या वरील चार ही कार्यक्रमाला वडवणी शहरासह तालुक्यातील तमाम आंबेडकर विचार व विचाराच्या समाज बांधवांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ तसेच भोजनाचा स्वाद घ्यावा असे आव्हान जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष व वडवणी नगरपंचायतीचे नगरसेवक युवा नेते राहुल घाडगे, कार्याध्यक्ष-परमेश्वर उजगरे, उपध्यक्ष-बाबासाहेब वाघमारे, प्रशांत (लखन) उजगरे, समाधान उजगरे, दिलीप रोकडे, सचिव-अमोल मुरालीधर उजगरे, कोषाध्यक्ष-शाम सुधाकर उजगरे, संघटक-प्रज्वल उजगरे, अजिंक्य उजगरे, सहसंघटक- अमोल वाघमारे, युवराज उजगरे, सहसचिव-किरण उजगरे (आमदार), राज उजगरे, रामेश्वर पाटोळे यांनी केले आहे. तर दि. २२ एप्रिल २०२५ वार मंगळवार रोजी सायंकाळी ७ वाजता महाराष्ट्राचे ख्यातनाम आनंद शिंदे यांचे चिरंजीव युवागायक व संगीतकार उत्कर्ष शिंदे यांचा भिमगीताचा कार्यक्रम होणार आहे. तर दि. ३० एप्रिल २०२५ वार बुधवार रोजी सायंकाळी ४ वाजता विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य दिव्य अशी मिरवणूक निघणार आहे. तरी या कार्यक्रमाला देखील उपस्थित राहण्याचे आव्हान जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात हायमॅक्स विद्युत पोल बसविला

पाटोदा । प्रतिनिधी

येथे पाहिजे जातीचे! येर गबाळ्याचे काय काम!! संत तुकाराम महाराजांच्या या विचारांना धरून कार्य करणाऱ्या व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आपले सर्वस्व म्हणून आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा नगरपंचायतच्या सौ. रुपाली संदीप जावळे यांनी पाटोदा शहराच्या विकासाची दमदार सुरुवात केली आहे.

नगरसेवक म्हणून निवड झाल्यानंतर लगेचच त्यांनी प्रथम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात अत्याधुनिक हायमॅक्स विद्युत पोलची उभारणी केली आहे.हा हायमॅक्स पोल बसविण्यामुळे चौकातील रस्ता अधिक उजळला असून, वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. तसेच, रात्रभर उजळणार्या प्रकाशामुळे स्थानिक नागरिकांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण झाला आहे.सौ. रुपाली संदीप जावळे यांनी त्यांच्या पहिल्याच कामगिरीतून दमदार कामगिरी दाखवून दिली असल्याने समाज बांधवांमध्ये त्यांच्या पुढील कामांबाबत आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिकांनी त्यांच्या या उपक्रमाचे स्वागत केले असून,''पाटोदा शहर व भीम नगरच्या विकास कामांमध्ये गती येणार'' अशी प्रतिक्रिया नागरिक व मतदार बंधू कडून मिळाली आहे.

# अधिकारी – गुत्तेदार यांच्या संगणमताने पाच कोटी ९८ लाख ६२ हजार रुपयांच्या कामात कालवली माती

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत पिसेगाव-उंदरी-आडस रस्त्याच्या कामातील प्रकार

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील पिसेगाव, गांजपूर, उंदरी, आडस रस्त्यासाठी दहा वर्षाच्या प्रतीक्षा नंतर मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून पाच कोटी ९८ लक्ष ६२ हजार रुपयांच्या रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाली असून मात्र हे काम चांगलं न करता गुत्तेदार व अधिकारी यांच्या संगनमताने या रस्त्याच्या कामांमध्ये काळी माती टाकून करत असल्याचं समोर आला आहे. एकीकडे शासन ग्रामीण भागातील लोकांना दळणवळणासाठी गैरसोय होऊ नये यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करून दळणवळणासाठी रस्ते चांगले करण्याचे काम करत आहे सर त्या कामाच्या पैशावर अधिकारी व गुत्तेदार भ्रष्टाचार करून स्वतःचे घर भरण्याचं काम करत आहेत पिसेगाव उंदरी रस्त्यावर जे काही काळी माती टाकून बोगस काम करीत होते ते काही जागरूक ग्रामस्थांनी रोखले व









### पालकमंत्री अजित पवार यांचा अधिकारी व गुत्तेदार यांच्यावर वचक राहिला नाही का?

टाकलेल्या काळ्या मातीचे फोटो काढून इंजिनियर यांना माहिती दिल्यानंतर त्यांनी मी कामावर येऊन बघतो असं ग्रामस्थांना आश्वासित केलं मात्र या कामातील इंजिनिअर व गुत्तेदार यांच्यावर काम बोगस करीत असतील तर चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत..

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीमध्ये सर्व अधिकाऱ्यांना व कुत्तेदारांना चांगले काम करण्याच्या सूचना दिले आहेत मात्र त्यांना कोणीच मोजत नसल्याचे दिसून येत आहे. कोट्यावधी रुपयांची कामे हे बोगस करून अधिकारी व गुत्तेदार स्वतःची घर भरण्याचे काम करत आहेत याकडे जिल्हाधिकारी व सीईओ यांनी लक्ष देऊन चौकशी करून बोगस काम करणाऱ्या अधिकारी व गुत्तेदारावर कार्यवाही करून त्यांचे लायसन काळे यादीत टाकण्यात यावे आधीच ग्रामीण भागामध्ये रस्त्यांचे काम लवकर होत नाहीत अशातच पिसेगाव उंदरी आडस रस्त्याला दहा वर्षानंतर नवीन कामाची सुरुवात झालेली आहे या रस्त्यावरून आठ ते दहा गावांचे नागरिक दळणवळणासाठी रस्त्याचा वापर करीत आहेत त्यामुळे पालकमंत्री अजित दादा यांनी अशा गुत्तेदार व इंजिनियर अधिकाऱ्यांवर चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुशील नेहरकर व इतर ग्रामस्थ करत आहेत.

इंजिनीयर मते साहेब यांना मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून चालू असलेल्या पिसेगाव, उंदरी, आडस रस्त्यावर खडी डांबर टाकण्याऐवजी काळी माती टाकली जात आहे या संदर्भात माहिती विचारण्यासाठी फोन केला असता त्यांचा मोबाईल क्र. ९८२२७३७४०१ हा बंद सांगत होता त्यामुळे त्यांची बाजू समजू शकली नाही

पिसेगाव, उंदरी, आडस रस्त्यावर काळी माती टाकून बोगस रस्ता करत आहेत त्यामुळे या बोगस कामाची चौकशी करून गुत्तेदार व संबंधित अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल.
सामाजिक कार्यकर्ते सुशील नेरकर

# सुख हे ईश्वर नामात आहे –नारायण महाराज गिरी



चौसाळा । प्रतिनिधी

माणूस सतत सुख मिळवण्यासाठी दररोज प्रयत्न करतो परंतु त्याला खरे सुख समाधान मिळत नाही खरे सुख व समाधान करायचे असेल तर मनाला शांती प्राप्त करायचे असेल तर ते सुख केवळ ईश्वर नामात आहे असे प्रतिपादन ह भ प नारायण महाराज गिरी उ पिंपरीकर यांनी केले चौसाळा तालुका बीड येथील शिवाजीनगर हनुमान मंदिरामध्ये प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले सदर सप्ताहात ह भ प नारायण महाराज गिरी यांनी आपल्या कीर्तनातून सदा नाम घोष करू हरी चा सदाचित समाधानी या अभंगावर कीर्तन करून सांगितले की हरिनाम ईश्वर नामातखरे सुख व समाधान आहे त्यामुळे मनाला शुद्धता नेहमीशांती प्राप्त होऊन माणूस सदैव सुखात राहतोअसे सांगितले सदर आयोजित केलेल्या सप्ताहात दररोज या सप्ताहात अनेक मान्यवर कीर्तनाचेआयोजन केले आहे या सप्ताहाचा नागरिकांनी अवश्य लाभ घ्यावा असे आव्हान हनुमान मंदिरसप्ताह तील नागरिकांनी केले आहे

# १८ तास अभ्यास करून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात १८ तास अभ्यास अभियान राबवून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

सुंदरराव सोळंके महाविद्यालय व क्रांतीसुर्य म. ज्योतिबा फुले सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील राजर्षी शाहू महाराज ग्रंथालयात १८ तास अभ्यास अभियान राबविण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन जेष्ठ पत्रकार उमेशजी मोगरेकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एम. ए. कव्हळे होते तर पत्रकार उमेश जेथलिया, प्रा. सुदर्शन स्वामी, अशोक मगर सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब ताकट,उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य प्रा पवन शिंदे ,पर्यवेक्षक महादेव अलझेंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त देशभरात विविध उपक्रम साजरे केले जात आहेत.त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांसाठी आठरा तास अभियान उपक्रम घेण्यात आला. यावेळी उद्घाटनपर भाषण करताना उमेशकाका मोगरेकर म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य देशालाच नाही तर जगाला प्रेरणादायी व दिशादर्शक आहे.समताभिमुख समाज घडविण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान महत्वाचे आहे.

पान ३ वर





# क्रीडा भारती स्थापना दिवस उत्साहात साजरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

क्रीडा भारती अंबाजोगाई च्या वतीने श्री हनुमान जयंती तथा क्रीडा भारती स्थापना दिवस उत्साहात संपन्न झाला. श्रीराम नगर अंबाजोगाई येथील केशरीनंदन हनुमान मंदीरात आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा भारतीच्या स्थापना दिनाच्या निमित्ताने बलोपासनेची देवता श्री महाबली हनुमानाची जन्मदिनाच्या निमित्ताने पुजा व आरती करण्यात आली.

यावेळी क्रीडा भारती चे योग शिक्षक उत्रेश्वर पांचाळ गुरुजी यांनी पान ३ वर

# चेंबूरच्या अखंड हरिनाम सप्ताहात नामदार पंकजाताई मुंडेंचा आपल्या माणसांशी संवाद

## जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर; कीर्तन श्रवणाने भावी पिढीवर चांगले संस्कार

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रसंत भगवान बाबा, संत वामनभाऊ, संत गहिनीनाथ महाराज यांचे विचार सप्ताहाच्या माध्यमातून जोपासण्याचे काम आपण सर्व करत आहात, हे अतिशय कौतुकास्पद आहे. कीर्तन श्रवणाने भावी पिढीवर चांगले संस्कार होतात, ज्याची आज खरी गरज आहे असे सांगत जनतेच्या सेवेसाठी आणि त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी सदैव तत्पर आहोत अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी भाविकांशी संवाद साधला.



चेंबूर मुंबई येथील इंदिरानगर भागात श्री वैजनाथ सेवा मंडळाच्या वतीने आयोजित अखंड हरिनाम सप्ताह आणि ज्ञानेश्वरी पारायण सांगता ना. पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत आज मोठया उत्साहात पार पडली, त्यावेळी त्या बोलत होत्या. ह.भ.प. बापू महाराज उखळीकर यांच्या काल्याच्या कीर्तन श्रवणाचा यावेळी त्यांनी लाभ घेतला. बीड, परळी व मराठवाड्यातील बहुतांश नागरिक या भागात वास्तव्यास आहेत. आपल्या जिवाभावाच्या माणसांशी यावेळी संवाद साधता आला याचा मनस्वी आनंद झाला असल्याचे सांगत त्या म्हणाल्या, मी मुद्दामहून सप्ताहाला उपस्थित राहिले. या भागात आपली माणसं राहतात, त्यांना खास भेटण्यासाठी इथे आले, त्यांनी केलेला हा उपक्रम खरोखरच स्त्युत्य असा आहे. याप्रसंगी वैजनाथ सेवा मंडळाच्या वतीने ना. पंकजाताई मुंडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आ. तुकाराम काते, सेवा मंडळाचे अध्यक्ष सोमनाथ इंगळे, बबन शिंदे, वाल्मिक गोल्हेर, राजाभाऊ आघाव, संदीप इंगळे आदींसह असंख्य भाविक उपस्थित होते.

# हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतिक असणाऱ्या पीर बाबा उत्सवाला सुरुवात

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

संपुर्ण देशात धर्माच्या सावटाखाली देश वावरत चालला हिंदू/ मुस्लिम वाद दगली असे अनेक प्रकार आपल्या बघायला मिळतात अनेक प्रकार होत असताना सधा बीडसागवी येथे सगळ्या गोष्टींचा अपवाद ठरतेय.

अनेक वर्षे पासून हिंदू/ मुस्लिम बांधव गुणा गोविंद राहतात हिंदू/ मुस्लिम ऐक्याचे प्रतिक आसणारा पीर बाबा ( पीर साहेब बाबा) बीडसागवी गणगेवाडी कणसे वाडी गुडेवाडी आणि परिसरातील अठरापगड जातीचे धर्माचे श्रद्धास्थान असलेले पीर बाबा यांच्या उरुसाला दि १६ ते१७..रोजी सुरवात होणार आहे या उरुसाला पश्चिम महाराष्ट्र ऊस तोडणी वाले पनवेल पुणा संभाजीनगर या यात्रेसाठी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून अठरा पगड जातीचे धर्माचे बांधव न चुकता उरुसाला हजरे लावतात पीर साहेब बाबा उरुस पौर्णिमेला चौथ्या दिवशी चौथीला पौर्णिमेचा चंद्र उगवला पीर बाबा मुळ ठाण गुडेवाडी येथे आहे तेथून बीडसागवी येतात बीडसागवी येथे पीर साहेब बाबा दर्गा आहे आल्यानंतर देवाला घोड्यावर बसतात आणि वर्षापासून चालत आलेल्या परंपरेनुसार पाटील चा मान असून पाटील चादर वाढून आणि ग्रामपंचायत च्या पदाधिकारी वतीने पीर साईबाबा व ग्रामस्थ चादर चढून भव्य दिव्य पीर बाबा साहेबाची दर्गा पासून ते पाटलाच्या गडी पर्यंत छबिना मिरवणूक पीर साहेब बाबा दर्ग्याला विद्युत रोषणाई डीजे बँजो पथक पारंपारिक पथक डाव खेळताना दिसतात दुसऱ्या दिवशी खेळ खेळणे दुकाना खायचे दुकाने असतात चार ते सहा वेळेस भव्य दिव्य कुस्तीचा आखाडा फड आयोजित केला आहे नंतर आठ ते दहा वाजेपर्यंत कोल्हापूर येथील कार्यक्रम सुतार बधुचा आर्केस्ट्रा सादर होईल आणि शेवटची कुस्ती पहिलवान कल्याण मोहोळकर यांची ११००० ची कुस्ती होणार आहे असे



# बीडमध्ये उसळणार भीमसागर!

## बीड पोलिसांचा राहणार तगडा बंदोबस्त; सार्वजनिक जयंती उत्सव समितीने दिली माहिती

बीड । प्रतिनिधी

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती आज सोमवार (दि.१४) एप्रिल रोजी बीड शहरासह जिल्ह्यात मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.त्या अनुषंगाने बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी जनसागर लोटणार असून दिवसभर पोलिसांचा तगडा बंदोबस्त असणार आहे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विश्वातल्या अनेक देशात साजरी केली जात असून बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बीड शहरात ४ एप्रिल १४ एप्रिल या कालावधीत विविध कार्यक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून आयोजित करण्यात आले होते. त्या सर्व कार्यक्रमांना अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता.

पान ३ वर



### पांढरे वस्त्र परिधान करुन समाज होणार सहभागी!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी आंबेडकरी जनता, बौद्ध उपासक- उपासिका पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून अभिवादन रॅलीसह जयंती मिरवणुकीत सहभागी होणार आहेत.

### या ठिकाणाहून निघणार अभिवादन रॅली,मिरवणूक

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून सकाळी आठ वाजता अभिवादन रॅली काढली जाणार आहे. ही अभिवादन रॅली, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती आणि भारतीय बौद्ध महासभा यांच्यासह शहरातील बौद्ध विहार कमिट्यांकडून काढली जाणार आहे.

# मस्साजोग येथील नदीचे खोलीकरण डिझेल खर्चासह मोफत- ॲड अजित देशमुख यांचे नियंत्रण

बीड । प्रतिनिधी

मस्साजोग येथील नदीच्या खोलीकरणाच्या कामाची प्रगती होत आहे. नाम फाउंडेशन मार्फत हे काम पूर्णपणे विनामूल्य होत आहे. ॲड. देशमुख यांच्या विनंतीमुळे पोकलेन मशीनच्या खर्चासह डिझेलचा खर्च देखील नाम फाउंडेशन करत असल्याने स्व. संतोष देशमुख यांना खऱ्या अर्थाने ही श्रद्धांजली ठरत असल्याचे मत जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित देशमुख यांनी व्यक्त केले.

या कामावर ॲड. अजित देशमुख यांचे नियंत्रण असून त्यांनी या कामाला पुन्हा भेट दिली आहे. यावेळी त्यांच्या समवेत स्वर्गीय संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख हे देखील होते. धनंजय देशमुख हे दुःखातून सावरलेले नाहीत. त्यामुळे ते अन्य कोठेही जात नाहीत. मात्र आमच्या विनंतीला मान देऊन ते नदी खोलीकरणाच्या कामाला भेट देण्यासाठी आले. काम प्रगतीपथावर आहे. एक किलोमीटर पेक्षा जास्त नदीच्या क्षेत्रातील गाळ काढण्याचे काम झाले असून आणखी अडीच किलोमीटर ते तीन किलोमीटर पर्यंत हे पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# गर्भवती महिला मृत्यू प्रकरण: आता ‘ससून’ची समिती करणार तिन्ही रुग्णालयातील उपचारांची चौकशी

पुणे । प्रतिनिधी

नुकताच तनिषा भिसे मृत्यू प्रकरणातील तिसरा अहवाल राज्य शासनाला प्राप्त झाला आहे. याअगोदर राज्य शासनाला तनिषा यांच्या मृत्यू प्रकरणातील सार्वजनिक आरोग्य विभाग आणि धर्मादाय सह आयुक्त समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे.

अखेर तिसरा अहवाल पुणे महापालिकेच्या माता मृत्यू समितीने राज्य शासनाला सूपूर्त केला आहे. या अहवालात मातेच्या मृत्यूचे नेमकं कारण कोणते याचे विश्लेषण करण्यात आले आहे. आता




या प्रकरणात दीनानाथ रुग्णालयाची तपासणी ससून रुग्णालयातील चौकशी समिती करणार असल्याची माहिती मिळत आहे. याशिवाय इतर दोन्ही रुग्णालयातील देण्यात आलेल्या उपचारांची चौकशी देखील या समितीमार्फत करण्यात येणार आहे.

गर्भवती महिलेच्या मृत्यूचा तपास आता ससून रुग्णालय करणार आहे. या प्रकरणी डॉक्टरांचा निष्काळजीपणा झाला का याची चौकशी ससून रुग्णालयाची चौकशी समिती करणार आहे. तसेच गर्भवती महिलेला ज्या तीन रुग्णालयात उपचार देण्यात आले होते. या तिन्ही रुग्णालयाच्या उपचारांची चौकशी या समितीमार्फत करण्यात येणार आहे. पुणे पोलिसांनी यासंबंधीचे पत्र पुणे पोलिसांना दिल्यानंतर या प्रकरणाची चौकशी ससून रुग्णालयातील चौकशी समिती मंगळवारपासून करणार आहे.

# येमाई देवीच्या पालखी सोहळ्यात पारंपरिक वाद्यांचा गजर

कवठे येमाई, : सनईच्या सुमधुर सुरावर ढोल-ताशा, संबळ, डफ, झांज, लेझीम पथक यांसारख्या पारंपरिक वाद्यांचा गजर, आकर्षक रंगीबेरंगी फुलांनी सजवलेली पालखी, भंडाऱ्याची उधळण अन् ‘अंबाबाईचा उदो उदो... जगदंबेचा उदो उदो’च्या जयघोषात मोठ्या भक्तिमय वातावरणात कवठे येमाई (ता. शिरूर) येथील श्री येमाई देवीचा पालखी सोहळा पार पडला.



कवठे येमाई येथील श्री येमाई देवीच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविकभक्त दरवर्षी हजेरी लावत असतात. नवसाला पावणारी कुलस्वामिनी म्हणून हे मंदिर प्रसिद्ध आहे. चैत्र पौर्णिमेनिमित्त दरवर्षी यात्रोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. शुक्रवारी (ता. ११) श्री येमाई देवी सभागृहापासून देवीला चोळी-पातळ वाजत-गाजत नेण्यात आले. गावापासून साधारण ३ किलोमीटर अंतरावर असलेल्या देवीच्या मंदिरात शनिवारी (ता. १२) सकाळी अभिषेक व महापूजेने दिवसाची सुरुवात झाली. दरम्यान हनुमान जयंतीनिमित्त हनुमान चालिसा आणि भजनाचे आयोजन केले होते. त्यानंतर आकर्षक फुलांनी सजवलेली पालखी सनईच्या सुरावटीत आणि ढोल-ताशांच्या निनादात मंदिराकडे रवाना झाली.

गावातील विविध मंडळांनी पारंपरिक ढोल-लेझीम पथकाच्या साहाय्याने प्रात्यक्षिक सादर करत वातावरण अधिक रंगतदार केले. यावेळी दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. ‘अंबाबाईचा उदो उदो... जगदंबेचा उदो उदो’च्या जयघोषात आणि भक्तिभावाने अनवाणी पायांनी पालखी गावापासून मंदिरात नेण्यात आली. आरती व ओलांड्याने पालखी सोहळ्याची सांगता झाली.

यात्रेनिमित्त मंदिर परिसर विद्युत रोषणाईने उजळून निघाला आहे. मंदिराला आकर्षक रंगीबेरंगी फुलांनी सजविण्यात आले आहे. तीन दिवस चालणाऱ्या या यात्रोत्सवात पालखी मिरवणूक, ढोल-लेझीम स्पर्धा, दारू काम, बैलगाडा शर्यती, तमाशा आदी कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. रविवारी (ता. १३) चितपट निकाली कुस्त्यांचा जंगी आखाडा रंगणार आहे.

# कोर्हाळे घटनेतील आरोपींना कठोर शिक्षा व्हावी: डॉ. गोर्हे

बारामती: गावच्या यात्रेपूर्वी माझ्याशी लग्न कर, अन्यथा तुझ्या आई-वडिलांचे मुंडके कोयत्याने उडवेन, अशी धमकी दिल्याने बारामती तालुक्यातील कोर्हाळे खुर्द येथे १६ वर्षीय अल्पवयीन मुलीने तरुणांनी दिलेल्या त्रासामुळे आत्महत्या केली. यावर विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोर्हे यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली.

आजही आपल्या समाजात अशा घटनांमुळे अल्पवयीन मुलींना सुरक्षित वातावरणात जगता येत नाही, ही अतिशय गंभीर बाब आहे. आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे, असे मत डॉ. गोर्हे यांनी व्यक्त केले.

डॉ. गोर्हे म्हणाल्या, अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीची भूमिका बजावली पाहिजे. मुलींना कोणताही त्रास, छेडछाड अथवा धमकी दिली जात असेल, तर त्यांनी कोणतीही भीती न बाळगता ११२ या पोलिस हेल्पलाइन क्रमांकावर तातडीने संपर्क साधावा.

महिला सहायता संस्था जसे की, स्त्री आधार केंद्र यांच्याकडे संपर्क साधून मदत घेता येईल. पालकांनीही मुलींच्या वागण्यात



कोणतेही भावनिक वा मानसिक बदल जाणवले, तर त्याकडे दुर्लक्ष न करता त्यांच्याशी संवाद साधावा. सुरक्षितता, भावनिक आधार आणि समजुतदारपणाची गरज असलेल्या अशा प्रसंगांमध्ये पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

या घटनेतील आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे. समाजात अशा अमानुष वागणुकीला थारा नाही. आपली जबाबदारी आहे की अल्पवयीन मुलींना सुरक्षित, सन्मानजनक आणि निर्भय आयुष्य मिळावे, असे मत डॉ. गोर्हे यांनी व्यक्त केले.

**मुख्य आरोपीला अटक; चार दिवसांची पोलिस कोठडी**

अल्पवयीन मुलीला दिलेल्या त्रासातून तिने आत्महत्या केल्याने वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्यात चौघांविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल झाला आहे. त्यातील मुख्य आरोपी विशाल दत्तात्रय गावडे याला वडगाव निंबाळकर पोलिसांनी अटक केली. त्याला बारामती न्यायालयापुढे हजर करण्यात आले. नयायालयाने त्याला १५ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. गुन्हा दाखल झालेले प्रवीण नामदेव गावडे, शुभम सतीश गावडे व सुनील हनुमंत खोमणे हे तिघे अद्याप फरार आहेत. यासंबंधीचा तपास सुरू असल्याची माहिती वडगावचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन काळे यांनी दिली.

# पुण्यातील बेपत्ता तरुणीचा मृतदेह भीमा नदीपात्रात विच्छिन्न अवस्थेत; तरुणासोबत दुचाकीवर जातानाचे सीसीटीव्ही समोर

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

पुण्यातील राजगुरुनगर येथून बेपत्ता झालेल्या अल्पवयीन मुलीची हत्या झाल्याची धक्कादायक बातमी समोर येत आहे. महाविद्यालयात जाते म्हणून सांगून गेलेली तरुणी कालपासून बेपत्ता होती. मात्र आज तिचा मृतदेह भीमा नदीपात्रात सापडल्याने मोठी खळबळ उडाली आहे. महाविद्यालयातून ही तरुणी एका तरुणासोबत दुचाकीवरून गेल्याचे सीसीटीव्ही फुटेज सापडल्याने तरुणीचा खून झाल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पोलीस तपासात पिडित अल्पवयीन मुलीच्या डोक्यात अन तोंडावर गंभीर दुखापत असल्याचं आढळलं. दुचाकीवरून घेऊन जाणारा तरुण नेमका कोण? अल्पवयीन मुलीची हत्या नेमकी कोणी अन का केली? याचा तपास खेड पोलीस करतायेत.

नक्की काय झाले?

पुण्यातील राजगुरुनगर येथील महाविद्यालयीन तरुणी काल बेपत्ता झाली होती. मात्र आज या महाविद्यालयीन तरुणीचा मृतदेह भीमा नदीपात्रात



आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पीडित तरुणीचा मृतदेह मांजरेवाडी येथे भीमा नदीच्या पात्रात आढळला असून पोलीस तपासात तरुणीचा खून झाल्याचे उघड झाले आहे. महाविद्यालयात गेलेली मुलगी गावातील एका तरुनसोबत दुचाकीवरुन गेल्याचे सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले आहे. काल गायब झालेल्या या अल्पवयीन मुलीचा मृतदेह आज भीमा नदी पात्रात आढळल्यानं खळबळ उडाली होती. यावरून ही हत्या असल्याचा अन पुरावे नष्ट करण्याच्या हेतूने नदीत फेकून दिल्याचा अंदाज आहे. तरुणी बेपत्ता झाल्याची तक्रार तिच्या आई-वडिलांनी नोंदवल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्री फिरवली. तरुणीचा शोध घेत असताना भीमा नदी पात्रात एका तरुणीचा मृतदेह असल्याचं स्थानिकांनी स्पष्ट केलं. पोलिसांनाही माहिती दिली त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी जात तपास केला. या तपासांतर्गत तरुणीच्या डोक्यात व तोंडावर जबर मार व दुखापत झाल्याचे पोलिसांनी स्पष्ट केलं. तरुणीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पुण्यातील ससून रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. पीडित तरुणीचा खून झाल्याचा प्राथमिक अंदाज खेड पोलिसांनी वर्तवलाय.

# बांग्लादेशी मुलीला मैत्रिणीने बुधवार पेठेत ५ लाख रुपयांना विकले

पुणे – बांग्लादेशची सीमा बेकायदा ओलांडून मैत्रिणीबरोबर आलेल्या एका अल्पवयीन मुलीवर पुण्यात मोठी आपबीती ओढवली. या मुलीला मैत्रीणीनेच तीन लाख रुपयांना बुधवार पेठेतील एका कोठेवालीला विकले. यानंतर कोठेवालीने ‘तु बांग्लादेशी असल्याचे पोलिसांना सांगून गुन्हा दाखल करेल’ अशी धमकी देत तीला जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडले. पाच महिण्यात झालेल्या अत्याचाराला वैतागून तरुणीने कशीबशी स्वत:ची सुटका करत पोलीस ठाणे गाठले. तीने दिलेल्या तक्रारीनूसार पाच महिलांवर गुन्हे दाखल झाले असून एका महिलेला फरासखाना पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार पिडीत मुलगी १६ वर्षे दोन महिण्यांची आहे. तीला बांग्लादेशातून मैत्रिणीने नोकरी आणि फिरण्याचे आमिष दाखवत पुण्यात आणले. यासाठी त्यांना बांग्लादेशातून नदीमार्गे बेकायदा भारतीची सीमा ओलांडली. पुण्यात आल्यावर त्या भोसरीमध्ये सात ते आठ दिवस राहिल्या. यानंतर तीच्या मैत्रिणीने तीला बुधवार पेठेत आणले. तीथे तीला एका महिलेला पाच लाखाच विकले.

यानंतर महिलेने तीला तुळशीबाग आणि बुधवार पेठेतील कोठ्यात ठेवले. तीला पोलिसांत देण्याची धमकी देत वेश्याव्यवसाय करण्यात भाग पाडले. पिडीतेला अत्याचार सहन होत नव्हते. मात्र तीला खोलीतून बाहेर पडू दिले जात नव्हते. पाच महिणे अत्याचार सहन केल्यावर तीने एकदा सुटकेचा प्रयत्न केला, मात्र तो असफल झाला. मात्र ती सात एप्रिलला कशीबशी खोलीतून बाहेर पडली.

तीने बस, रिक्षा पकडत हडपसर गाठले. तेथे हडपसर पोलीस ठाण्याची माहिती मिळताच तेथे धाव घेत तक्रार दाखल केली. हडपसर पोलिसांनी गुन्हा दाखल करत तो फरासखाना पोलिसांकडे वर्ग केला. याप्रकरणी फरासखाना पोलिसांनी पाच महिलांवर गुन्हा दाखल करत एका महिलेला अटक केली आहे. याप्रकरणाचा पुढील तपास तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत भस्मे करत आहेत.



# डीपीजवळ कचरा जाळल्याने वीजपुरवठा खंडित, कारवाईचा इशारा

वाघोली- लोणीकंद परिसरात पुणे-नगर महामार्गालगत असलेल्या महावितरणच्या डीपी आणि मोरीमध्ये नागरिक कचरा टाकून तो जाळत असल्याने महावितरणच्या वायरिंगचे नुकसान होत आहे. यामुळे परिसरातील वीजपुरवठा काही तासांसाठी खंडित करावा लागत आहे. महावितरणने महापालिका आणि ग्रामपंचायतीला कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी सूचना दिल्या असून, नागरिकांना डीपी आणि एचटी लाईनजवळ कचरा टाकू नये, असे आवाहन केले आहे. वाघोलीतील कोणत्याही डीपीजवळ कचरा टाकून तो जाळू नये. वीजपुरवठा खंडित झाल्यास महावितरण आणि मनपा अधिकाऱ्यांमार्फत कचरा टाकणाऱ्यांवर आणि जाळणाऱ्यांवर कारवाईसाठी पाठपुरावा करू, असे माजी जिल्हा परिषद सदस्य रामभाऊ दाभाडे यांनी सांगितले.

# पुण्यात आईनेच बॉयफ्रेंडला पाठवले लेकीचे अश्लील व्हिडिओ, अनैतिक संबंध ठेवण्यासही पाडले भाग

पुणे : माय लेकीच्या नात्याला काळिमा फासणारी घटना पुण्यातून समोर येत आहे. एका आईनं बॉयफ्रेंडच्या मदतीने स्वत:च्या मुलीचे अश्लील व्हिडिओ काढून व्हायरल केले आहेत. तसेच आईने मुलीचे हे आक्षेपार्ह व्हिडिओ बॉयफ्रेंडलाही पाठवत त्याला पोटच्या मुलीसोबत अनैतिक संबंध ठेवण्यास सांगितले. पोलिसांनी या घटनेनंतर विकृत आई आणि तिच्या प्रियकराला अटक केली आहे.

भारती विकास कुऱ्हाडे या महिलेचे गुरूदेव कुमार स्वामी याच्यासोबत अनैतिक संबंध होते. पुण्यातील बिबवेवाडी पोलीस स्टेशन हद्दीत दोघेही आरोपी राहत होते. काही दिवसांपूर्वी महिलेने आपल्या बॉयफ्रेंडसोबत पोटच्या लेकीचे अश्लील व्हिडिओ शूट केले.



नंतर व्हायरल केले. विकृत महिलेने ते व्हिडिओ काही नातेवाईकांनाही पाठवले.

तसेच तिने हा व्हिडिओ आपल्या बॉयफ्रेंडला पाठवत त्याला आपल्या मुलीसोबत अनैतिक संबंध ठेवण्यास सांगितले. अल्पवयीन मुलीला याची माहिती मिळाल्यानंतर तिने घरमालकाला आई आणि आईच्या बॉयफ्रेंडने केलेल्या कृत्याची माहिती दिली. त्यानंतर आरोपी आई आणि तिचा प्रियकर दोघेही फरार झाले.या घटनेची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी फरार आरोपी आई आणि तिच्या प्रियकराचा शोध घेण्यास सुरूवात केली. कसून चौकशी करत नराधम आईसह तीच्या बॉयफ्रेंडला बिबवेवाडी पोलिसांनी अटक केली. या संतापजनक घटनेची माहिती वाऱ्यासारखी परिसरात पसरल्यानंतर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

# तीर्थक्षेत्र विकासकामांची गुणवत्ता राखा – जिल्हाधिकारी डुडी

पुणे । प्रतिनिधी

जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र व पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी आराखड्यानुसार मंजूर असलेली सर्व कामे गुणवत्ता राखून तत्काळ पूर्ण करावीत, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिल्या आहेत.



जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तीर्थक्षेत्र व पर्यटन क्षेत्र विकास आराखडा संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी डुडी बोलत होते. तीर्थक्षेत्र विकासांतर्गत छत्रपती संभाजी महाराज समाधी स्थळ, वढू बु. व तुळापूर, मालोजी राजे भोसले यांची गढी , श्रीक्षेत्र जेजुरी गड, सुदुंबरे येथील श्रीसंत जगनाडे महाराज समाधी स्थळ, हुतात्मा शिवराम हरी राजगुरू जन्मस्थळ परिसर विकास, अष्टविनायक गणपती मंदिराचा जीर्णोद्धार करणे श्रीक्षेत्र भीमाशंकर तीर्थक्षेत्र विकास आराखडा या सर्व आराखड्यांच्या विकास कामांच्या प्रगती बाबत बैठकीत आढावा घेण्यात आला.

जिल्हाधिकारी डुडी म्हणाले की, तीर्थक्षेत्रांच्या विकास कामासंदर्भात मंदिर ट्रस्ट, संस्थान येथील स्थानिक पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन त्यांची मदत घेऊन कामे विहित मुदतीत पूर्ण करावीत स्थानिक पातळीवरच्या काही अडचणी असतील त्या प्रशासनातर्फे सोडण्यात येतील, काही ठिकाणी जमीन संपादनासंदर्भात येणाऱ्या अडचणीसाठी उपविभागीय अधिकाऱ्यांनी यात लक्ष घालून प्रक्रिया पूर्ण करावी.

तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी भाविकांसाठीच्या आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा उत्कृष्ट असल्या पाहिजे, कामे पूर्ण झाल्यावर त्यांची देखभाल व दुरुस्तीसाठी समिती स्थापन करण्यात यावी असे त्यांनी सांगितले.

# रुग्णवाहिका व दुचाकीचा अपघात; एक ठार तर सहा जखमी

तळेगाव ढमढेरे: पुणे- अहिल्यानगर महामार्गावर सणसवाडी येथे रुग्णवाहिका व दुचाकीच्या भीषण अपघातात रुग्णाचा नातेवाईक ठार तर सहा जण जखमी झाले. ही घटना गुरुवारी (दि. १०) रात्री सव्वादहा वाजेच्या सुमारास घडली.

रुग्णवाहिकाचालक फरार झाला असून शिक्रापूर पोलिस ठाण्यात याप्रकरणी सौरभ संतोष महाजन (रा. शिरूर) या रुग्णवाहिकाचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत जगन्नाथ बबनराव खोपकर (वय ६१, रा. सोलापूर रोड, फातिमानगर, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे.

पुणे-अहिल्यानगर महामार्गावरून रुग्णवाहिका ही शिरूर येथील एका हॉस्पिटलमधील रमेश राठोड या रुग्णाला घेऊन भरधाव पुण्याच्या दिशेने जात होती. यावर सौरभ महाजन हा चालक होता. सणसवाडीनजीक मजाक कंपनीसमोर रुग्णवाहिका चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून रुग्णवाहिका समोरील दुचाकीला जोरात धडकून अपघात झाला.

या अपघातात रुग्णवाहिकेतील रुग्णासोबत आलेला नातेवाईक सुमित बळीराम चव्हाण (वय २८, रा. रांजणगाव गणपती, ता. शिरूर) हा जागीच ठार झाला, तर दुचाकी चालक गोविंद श्रीरंग पोळ, दुचाकीवर मागे बसलेला सूरज गणेश जगदाळे व रस्त्याच्या कडेला उभा असलेला ऋषिकेश गणेश जाधव (तिघेही रा. सणसवाडी, ता. शिरूर), रुग्णवाहिकेतील रुग्ण रमेश काशिनाथ राठोड, विकी रमेश राठोड व उषा रमेश राठोड (सर्व रा. रांजणगाव गणपती, ता. शिरूर) हे गंभीर जखमी झाले.

# विदेशी पर्यटकाबरोबर गैरवर्तन करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करा; विविध संघटनांची मागणी

खडकवासला - विदेशी पर्यटकाबरोबर गैरवर्तन करणाऱ्यांचा तातडीने शोध घ्यावा. आणि त्यांच्यावर कडक कारवाई करावी. सिंहगड गडाचे पावित्र्य राखण्याची मागणी विविध संघटनांनी केली. हवेली पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांना निवेदन देऊन गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी केली.

समाज माध्यमावर व्हिडीओ पाहण्यात आला. न्यूझीलंडचा पर्यटक पायवाटेने सिंहगडावर जात असताना, वरुन खाली उतरणाऱ्या सुमारे १० जणांच्या समुहातील काही तरुणांनी त्याच्या मराठी भाषा अज्ञानाचा फायदा घेत काही घाणेरड्या शिव्या उच्चरायला लावल्या.

तसेच इतरही काही अश्लील शब्द बोलायला लावले. आणि त्याच्या तोंडून येणाऱ्या त्या शब्दांवर ते विकृतपणे हसून, त्याची मजा घेत होते. हा व्हिडीओ मध्ये ही मुलं छत्रपती संभाजीनगर येथील



असावीत असे दिसते. त्यांच्या सोबत काही मुलीही दिसत आहेत.हा न्यूझीलंडचा पर्यट यु ट्यूबर ही आहे. सिंहगडासारख्या ऐतिहासिक, पवित्र ठिकाणी घडलेली ही घटना सम्पूर्ण महाराष्ट्रालाच नव्हे, तर भारतालाही बदनामीकारक ठरणारी आहे. हा पर्यटक त्याच्या देशात हा प्रसंग सांगेल तेव्हा किती गैरसमज पसरणार आहेत.आपल्या देशाबद्दल, याची या तरुणांना कल्पना संस्कृतीचं माहेरघर असणाऱ्या शहराजवळच्या पवित्र सिंहगडावर घडलेला हा प्रसंग सर्वच शिवभक्तांमध्ये प्रचंड चीड आणणारा आहे. आज हजरो पर्यटक सिंहगडावर येत असतात. त्यात अशा हौश्या गौश्या, विकृत मनोवृत्तीच्या लोकांमुळे ही पवित्र स्थळ, आपला देश बदनाम होत असतो.

आमची निवेदनद्वारे आपणास नम्र विनंती आहे, की शिवभक्तांचा वाढता रोष लक्षात घेता, या प्रसंगातील सर्वच तरुणांना लकरात लवकर अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. तसेच सिंहगडावर येणाऱ्या ट्रेक रूटवर अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी पोलीस खात्याचा काही बंदोबस्तही असावा. अशी मागणी करण्यात आली आहे.या प्रसंगी सर्वप्रथम गड पावित्र्य मोहीम व सिंहगड परिवाराच्या वतीने इतिहास संशोधक डॉ. नंदकिशोर मते, नितीन वाघ, किरण पाटील, ऍड. प्रकाश केदारी, बाळासाहेब मंडलिक, आशिष पार्टे, वेद बुटाला यांनी निवेदन दिले.

शिवसेनेच्या वतीने विभागप्रमुख नितीन वाघ, महेश पोकळे, संघटक तानाजी गाढवे, केतन शिंदे, महेश विटे, कल्पेश वाजे, आकाश कुमावत यांनी निवेदन दिले.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे खडकवासला मतदारसंघाचे विभाग अध्यक्ष विजय मते, चंदन कड, राहुल वाळुंजकर, अंगराज भिसे, बाळासाहेब हनमघर, बाळासाहेब मंडलिक उपस्थित होते.

’राष्ट्रवादी’ गडकिल्ले संवर्धन सेलचे प्रदेशाध्यक्ष योगेश शेलार यांनी हवेली पोलिस दिले. प्रदेश उपाध्यक्ष समीर धुमाळ, पश्चिम विभाग अध्यक्ष मनोज भोसले, पुणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव उपस्थित होते.